रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ३३६
www.ramprahar.com
◆ बुधवार, २४ जून २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## एसटी कर्मचाऱ्यांना महागाई व घरभाडे भत्त्यासह वेतनवाढ

**मुंबई :** राज्य परिवहन (एसटी) महामंडळातील सुमारे ८६ हजार कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांना न्याय देण्यासाठी शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला असून राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणेच एसटी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि वार्षिक वेतन वाढ करण्यास मंजुरी देण्यात आली आहे, अशी घोषणा परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी मंगळवारी (दि.२३) विधानसभा व विधान परिषदेत केली. एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ५३वरून ५८ टक्के, घरभाडे भत्ता ८-१६-२४ टक्क्यांवरून १०-२०-३० टक्के, तर वार्षिक वेतनवाढीचा दर दोनवरून तीन टक्के करण्यात आला आहे. आगामी काळात महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, वार्षिक वेतनवाढीची थकबाकी आणि इतर वैधानिक देणी मिळून सुमारे पाच हजार ६४९ कोटी रुपये अदा करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचेही त्यांनी सांगितले. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

## अंतरंग

पनवेल मनपा तयार करणार शहर हवामान कृती योजना/३
मोरबे धरण क्षेत्रात दमदार पावसाने दिलासा/६
मराठमोळ्या सूर्यांश शेडगेला भारतीय संघात संधी/८

# महिला व बालकांवरील अत्याचार रोखण्यासाठी राज्य सरकारकडून व्यापक उपाययोजना -मुख्यमंत्री

### आमदार प्रशांत ठाकूर यांनी वेधले होते शासनाचे लक्ष

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यात महिला आणि बालकांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधले. या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारकडून विविध उपाययोजना केली जात असल्याचे सांगितले.




आमदार प्रशांत ठाकूर यांनी दाखल केलेल्या तारांकित प्रश्नात म्हटले होते की, आर्थिक पाहणी अहवाल २०२५-२६नुसार सन २०२५मध्ये महिलांवरील बलात्काराच्या ८,६४३ घटना नोंदविण्यात आल्या असून सन २०२४मध्ये हा आकडा ७,९४० इतका होता तसेच महिला व बाल अपराध प्रतिबंध विभागाच्या अहवालानुसार सन २०२४च्या तुलनेत सन २०२५मध्ये बालकांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये ५५५ने वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो (एनसीआरबी)च्या अहवालानुसार महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर असून राज्यात सुमारे ५० हजार गुन्ह्यांची नोंद झाली आहे. कोल्हापूर परिक्षेत्रात गेल्या दोन वर्षांत महिला अत्याचाराच्या २,१७८, तर विनयभंगाच्या ४,१९८ घटना घडल्याचेही समोर आले आहे. याशिवाय अहिल्यानगर जिल्ह्यात मागील चार वर्षांत सुमारे ७०० अल्पवयीन मुली अत्याचाराच्या बळी ठरल्या असून चालू वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यांतच हा आकडा ४०वर पोहचल्याचे निदर्शनास आले आहे.

बदलापूर येथील शाळकरी मुलींवरील अत्याचाराची घटना तसेच पुणे जिल्ह्यातील नरसापूर येथील चिमुरडीवरील अत्याचार प्रकरणामुळे राज्यभर संतापाची लाट उसळली होती. बालकांचे खून, अपहरण, लैंगिक अत्याचार तसेच कौटुंबिक किंवा परिचितांकडून होणाऱ्या विनयभंगाच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची बाबही आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रश्नाद्वारे अधोरेखित केली. पीडितांना निश्चित कालमर्यादेत न्याय मिळावा यासाठी शक्ती फौजदारी कायदा (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२०ची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी राज्यभरातून होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

याचबरोबर महिला व शाळकरी मुलींच्या सुरक्षेसाठी महिला सुरक्षा कक्ष, दामिनी पथके, समुपदेशन केंद्र, हेल्पलाईन, विशेष जनजागृती मोहिमा राबविणे, घरगुती व परिचितांकडून होणाऱ्या अत्याचारांना आळा घालणे तसेच महिला व बालकांवरील अत्याचारांचे खटले जलदगती न्यायालयांमध्ये चालविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र विशेष न्यायालये आणि विशेष तपास पथके (एसआयटी) स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे याची माहितीही आमदार प्रशांत ठाकूर यांनी मागितली. महिला व बालकांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत गंभीर असून दोषींवर कठोर कारवाई आणि पीडितांना जलद न्याय मिळण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी या प्रश्नाद्वारे अधोरेखित केले.

या प्रश्नावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले की, राज्यात आर्थिक पाहणी अहवाल २०२५-२६नुसार महिलांवरील बलात्काराच्या सन २०२५मध्ये ८,६४३ एवढ्या घटना, तर सन २०२४मध्ये ७,९४० एवढ्या घटना घडल्या आहेत. **(पान २ वर..)**

## वन्यजीव-मानव संघर्ष कमी करण्यासाठी विविध उपाययोजना : वनमंत्री नाईक

**मुंबई : प्रतिनिधी**



विदर्भातील पाच जिल्ह्यांमध्ये वाघांच्या हल्ल्यांमुळे झालेल्या मृत्यूंच्या पार्श्वभूमीवर राज्य शासन वन्यजीव-मानव संघर्ष कमी करण्यासाठी व्यापक उपाययोजना राबवत असून पुढील ४२ महिन्यांत विदर्भातील प्रत्येक जिल्ह्यात ताडोबाच्या धर्तीवर व्याघ्र प्रकल्प; तर कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि खानदेशातील प्रत्येक जिल्ह्यात बिबट सफारी विकसित करण्यात येणार असल्याची माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी मंगळवारी (दि.२३) विधानसभेत दिली.

विधानसभा सदस्य अतुल भातखळकर यांनी मानव वन्यजीव संघर्षावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबत शासन करत असलेल्या कार्यवाहीबाबत लक्षवेधी सूचना मांडली. या सूचनेदरम्यान इतर सदस्यांनी उपप्रश्न उपस्थित केले. यावर उत्तर देताना वनमंत्री नाईक म्हणाले की, वाघाच्या हल्ल्याच्या झालेल्या घटना अत्यंत दुर्दैवी असून अशा घटना टाळण्यासाठी शासन विविध उपाययोजना करत आहे. वन विभागाकडून कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना सतर्क केले जात असून जंगलात जाण्याबाबत वेळेचे निर्बंध आणि जनजागृतीही केली जात आहे.

वन्यजीवांच्या वाढत्या संख्येचे व्यवस्थापन करण्यासाठी केंद्र शासनाकडे बिबट्यांच्या नसबंदीच्या प्रायोगिक प्रकल्पाला परवानगी मागण्यात आली आहे. भविष्यात वाघांसाठीही अशा उपायांचा विचार केला जाऊ शकतो, असे सांगून वनमंत्री नाईक म्हणाले की, विदर्भातील सुमारे ४५० वाघ विविध व्याघ्र प्रकल्पांमध्ये वितरित करण्याची योजना आहे तसेच प्रत्येक जिल्ह्यात सुमारे पाच हजार एकर क्षेत्रावर बिबट सफारी उभारण्याचा मानस आहे. या प्रकल्पांमध्ये वन्यजीवांसाठी आवश्यक पाणी, फळझाडे आणि खाद्यसाखळी उपलब्ध करून देण्यात येईल, जेणेकरून प्राणी मानवी वस्त्यांकडे येण्याचे प्रमाण कमी होईल.

### ...तर आर्थिक मदतीसह नोकरीही देणार

मृतांच्या कुटुंबीयांना मदत करण्यासंदर्भात वनमंत्री नाईक यांनी सांगितले की, वाघ किंवा बिबट्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास २५ लाख रुपयांची मदत देण्याची तरतूद आहे. त्यातील १० लाख रुपये २४ तासांत दिले जातात. याशिवाय मृतांच्या कुटुंबातील पात्र सदस्याला कायमस्वरूपी नोकरी देण्यासाठी मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव ठेवण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

## राज्यातील जलप्रदूषणाच्या प्रश्नावर विधिमंडळात आवाज

**मुंबई** : राज्यात जलप्रदूषणाच्या समस्येमुळे नद्या, तलाव, धरणे, खाड्या, भूजल तसेच किनारी भागांच्या पर्यावरणावर होत असलेल्या परिणामाबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल करून शासनाचे लक्ष वेधले. या प्रश्नाला उत्तर देताना राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी जलप्रदूषण नियंत्रणासाठी सुरू असलेल्या उपाययोजनांची लेखी उत्तरातून माहिती दिली.

या प्रश्नाच्या माध्यमातून आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्यातील जलप्रदूषण, सांडपाणी व्यवस्थापन आणि सार्वजनिक आरोग्याशी संबंधित गंभीर प्रश्न मांडत प्रभावी उपाययोजनांची गरज अधोरेखित केली.

मंत्री पंकजा मुंडे यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले की, राज्यात जलप्रदूषण ही गंभीर पर्यावरणीय समस्या असल्याचे अंशतः मान्य करण्यात आले आहे. औद्योगिक सांडपाणी, अपुरी प्रक्रिया केलेले घरगुती सांडपाणी, शेतीतून वाहून जाणारी रासायनिक खते व कीटकनाशके तसेच विविध विकास प्रकल्पांमधून निर्माण होणारा कचरा यामुळे जलस्रोतांवर ताण वाढत आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था आणि कटक मंडळांकडून दररोज सुमारे ९,२७०.८ दशलक्ष लिटर सांडपाण्याची निर्मिती होत असून त्यापैकी ५,०२३.८५ दशलक्ष लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. उर्वरित सांडपाण्याच्या प्रक्रियेसाठी ५,६५० दशलक्ष लिटर क्षमतेची नवीन प्रक्रिया केंद्र उभारण्याचे काम सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. **(पान २ वर..)**

## दिव्यांग शाळांच्या नूतनीकरण विलंबाचा मुद्दा मांडला

**मुंबई** : राज्यातील दिव्यांग अनुदानित शाळांच्या नूतनीकरण प्रस्तावांमध्ये होत असलेल्या विलंबामुळे हजारो कर्मचाऱ्यांचे वेतन रखडल्याचा गंभीर मुद्दा आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे उपस्थित केला. या प्रश्नाला दिव्यांग कल्याणमंत्री अतुल सावे यांनी लेखी उत्तर दिले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी दाखल केलेल्या प्रश्नात राज्यातील सुमारे १५० दिव्यांग अनुदानित शाळांचे नूतनीकरण प्रस्ताव मागील तीन महिन्यांपासून दिव्यांग आयुक्तालय, पुणे येथे प्रलंबित असल्याने सुमारे तीन हजार कर्मचाऱ्यांचे एप्रिल २०२६ या महिन्याचे वेतन अडकून पडल्याचे निदर्शनास आणून दिले तसेच शाळा, वसतिगृहे आणि पुनर्वसन केंद्रांच्या नूतनीकरण प्रक्रियेला अंतिम मंजुरी देण्यात होणाऱ्या विलंबामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांचे शिक्षण, पुनर्वसन आणि मूलभूत सुविधांवर परिणाम होत असल्याचा मुद्दाही त्यांनी त्यामध्ये उपस्थित केला.

यावर लेखी उत्तरात मंत्री अतुल सावे यांनी सांगितले की, सुमारे १५० दिव्यांग अनुदानित शाळांचे नूतनीकरण प्रस्ताव प्रलंबित असल्याने कर्मचाऱ्यांचे वेतन रखडल्याचे अंशतः खरे आहे. दिव्यांग क्षेत्रातील संस्थांच्या नोंदणी व नूतनीकरणासाठी शासनाने महाराष्ट्र दिव्यांग सहाय्यक पोर्टल विकसित केले असून त्याद्वारे ऑनलाइन अर्ज स्वीकारले जात आहेत, मात्र या पोर्टलमध्ये काही तांत्रिक अडचणी आढळून आल्याने त्यावरील सुधारणा प्रक्रिया सुरू आहे. **(पान २ वर..)**

## निवडक

### राष्ट्रपतींच्या हस्ते पद्म पुरस्कारांचे वितरण; रोहित शर्माचा सन्मान

**नवी दिल्ली :** राष्ट्रपती भवनात मंगळवारी (दि.१६) आयोजित एका दिमाखदार सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते देशातील प्रतिष्ठित पद्म पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. क्रीडा जगतातून भारतीय पुरुष क्रिकेट संघाचा माजी कर्णधार रोहित शर्मा आणि महिला हॉकी संघाची माजी कर्णधार सविता पुनिया यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, तर भारताचे दिग्गज टेनिसपटू विजय अमृतराज यांना देशाचा तिसरा सर्वोच्च नागरी सन्मान 'पद्मभूषण' प्रदान करण्यात आला.

### भारताची ११ जहाजे होर्मुझ सामुद्रधुनीतून पुढे मार्गस्थ

**नवी दिल्ली :** अमेरिका आणि इराणमधील तणाव निवळल्यानंतर जागतिक व्यापाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असलेली होर्मुझ सामुद्रधुनी अखेर जहाजांच्या वाहतुकीसाठी खुला झाली आहे. या भागात सध्या १० भारतीय जहाजे सुरक्षितपणे प्रवास करत असून भारताकडे येणारी ११ जहाजे होर्मुझची सामुद्रधुनी पार करून पुढे मार्गस्थ झाली आहेत.

## लोहगडावरून पडून तरुणाचा मृत्यू अपघात नव्हे; तर खून!

### भावी पत्नीसह प्रियकर अटकेत



**पुणे : प्रतिनिधी**

लोणावळ्याजवळील लोहगडावरून पडून तरुण उद्योजकाचा मृत्यू झाल्याची घटना सुरुवातीला अपघात मानली जात होती, मात्र पुणे ग्रामीण पोलिसांच्या सखोल तपासातून हा मृत्यू नसून पूर्वनियोजित खून असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी मृत तरुणाची होणारी पत्नी आणि तिच्या प्रियकराला अटक करण्यात आली आहे.

मृत तरुणाची ओळख केतन विशाल अगरवाल (२५, रा. गहुंजे, मावळ) अशी आहे. त्याचा विवाह पुण्यातील सिया प्रवीण गोयल (२०) हिच्याशी ठरला होता. १८ जून रोजी केतन आणि सिया हे दोघे लोहगडावर फिरण्यासाठी गेले होते. दुपारी गडाच्या पश्चिमेकडील भागातील दरीत केतनचा मृतदेह आढळून आला. त्यावेळी सियाने फिरत असताना केतनचा पाय घसरला आणि तो दरीत कोसळल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे पोलिसांना सांगितले होते, मात्र केतनचे वडील विशाल अगरवाल यांनी त्याच्या अकस्मात मृत्यूबाबत संशय व्यक्त केला.

यानंतर पोलिसांनी सियाला ताब्यात घेऊन तिची चौकशी करण्यात आली. चौकशीत तिने प्रियकर चेतन बाबूलाल चौधरी (२२, रा. कोंढवा) याच्याशी संगनमत करून नियोजित पती केतन याला लोहगडावरून ढकलून देऊन खून केल्याची कबुली दिली. या प्रकरणी लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे.



## पनवेलमध्ये 'एसआयआर'संदर्भात बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मतदारयादी विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) अभियानासंदर्भात भाजप पनवेल विधानसभा मतदारसंघाचे बीएलए व नगरसेवक परेश ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रामुख्याने आगामी काळातील नियोजन, विविध विभागांमधील समन्वय, मतदार यादीसंदर्भातील त्रुटी व अद्ययावतीकरणाचे कामकाज तसेच बूथस्तरीय तयारीचा सविस्तर आढावा घेत सखोल चर्चा करण्यात आली.

या बैठकीला महापौर नितीन पाटील, नगरसेवक विकास घरत, अमर पाटील, प्रवीण पाटील, सुमित झुंजारराव, दशरथ म्हात्रे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर यांच्यासह मतदारसंघातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.


मतदारसंघातील प्रत्येक बूथ अधिक मजबूत करण्यावर या बैठकीत प्रामुख्याने भर देण्यात आला. संघटनात्मक बळकटीकरण आणि आखलेल्या योजनांची तळागाळापर्यंत प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ही बैठक अत्यंत महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## पावसामुळे शेतीकामांना वेग

**धाटाव : प्रतिनिधी**

वरुणराजाचे अखेर दमदार आगमन झाल्याने बळीराजाला मोठा दिलासा मिळाला आहे. शेतकऱ्यांनी पेरणीच्या कामांना सुरुवात केली असून सध्या शेतशिवारात उत्साहाचे वातावरण पहायला मिळत आहे.

यंदा पावसाने शेतकऱ्यांची चांगलीच परीक्षा घेतली. एरवी मान्सून सर्वसाधारणपणे ७ जूनच्या आसपास दाखल होतो. गेल्या वर्षी तब्बल १५ मे रोजीच पावसाने हजेरी लावली होती, मात्र यावर्षी २० जून उलटून गेल्यानंतरही समाधानकारक पाऊस झाला नव्हता. परिणामी शेतकरी चिंतेत सापडले होते. अखेर जलधारा बरसल्याने शेतकऱ्यांनी जोमाने कामाला सुरुवात केली असून बळीराजाच्या चेहऱ्यावर पुन्हा एकदा समाधान आणि आशेचे भाव उमटले आहेत.



# महाराष्ट्राचा 'महा एआय' उपक्रम देशात अभिनव ठरणार -मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या विभागांमधील कामकाज अधिक कार्यक्षम, सुरक्षित आणि लोकाभिमुख करण्यासाठी 'महा एआय' प्रगत कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी 'महाराष्ट्र हब' हा कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित देशातील पहिलाच अभिनव उपक्रम विकसित करण्यात आला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. लवकरच या उपक्रमाची अंमलबजावणी राज्यातील विविध विभागात होणार असून या माध्यमातून शासकीय कामकाजातील पत्रव्यवहार, टिपण्या, अहवाल तयार करणे, शासकीय कामांचे भाषांतर, दस्तऐवजांचे सारांश तसेच शासकीय ज्ञानभांडारातील माहिती शोधणे यांसारखी कामे अधिक वेगाने आणि अचूकपणे करता येणार असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



विधानभवन येथे महा एआय प्लॅटफॉर्मबाबत बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता,वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, प्रधान सचिव नवीन सोना, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, महाआयटीच्या संचालक भुवनेश्वरी एस,राज्य सूचना माहिती अधिकारी व उपमहासंचालक सपना कपूर यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यातील शासकीय यंत्रणेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत प्रशासन अधिक परिणामकारक करण्यासाठी 'महा एआय' महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राने महाराष्ट्रासाठी ही प्रणाली विकसित केली असून ती इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य डेटा सेंटरच्या पायाभूत सुविधांवर कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यामुळे शासकीय माहितीचे सार्वभौमत्व, गोपनीयता व सुरक्षितता सुनिश्चित होणार आहे.

सर्व संवेदनशील शासकीय माहिती शासनाच्या स्वतःच्या नियंत्रणाखाली राहणार असून, माहितीची साठवणूक व प्रक्रिया राज्य शासनाच्या सुरक्षित अधोसंरचनेमध्येच केली जाणार आहे. 'महा एआय'' प्रणालीद्वारे अधिकृत पत्रे, ई-मेल, टिपण्या तयार करणे, दस्तऐवजांचे संक्षिप्तीकरण, स्पष्टीकरण व भाषांतर, शासकीय नियम, अधिनियम, शासन निर्णय आणि परिपत्रकांवरील संदर्भाधारित माहिती शोधणे तसेच नैसर्गिक भाषेत अहवाल तयार करणे शक्य होणार आहे. लाभार्थ्यांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने लाभार्थी पडताळणीची सुविधाही उपलब्ध होणार आहे. सदर प्रणालीमध्ये विविध एआय मॉडेल्सची निवड, प्रतिमा व दस्तऐवज अपलोडची सुविधा उपलब्ध आहे. या प्रणालीमध्ये वापरकर्तानिहाय सुरक्षित लॉगिंग, एंड-टू-एंड एन्क्रिप्शन, पदानुसार प्रवेश नियंत्रण यांसारखी सुरक्षा वैशिष्ट्ये समाविष्ट करण्यात आली आहेत, त्यामुळे शासकीय दस्तऐवज आणि माहितीची गोपनीयता अबाधित राहणार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, भविष्यात 'महा एआय'चा वापर सर्व शासकीय विभागांमध्ये एकसमान एआय प्लॅटफॉर्म म्हणून करण्यात येणार आहे. तसेच ई-ऑफिस, आरटीआय, ई-एचआरएमएस, आपले सरकार यांसारख्या विविध ई-शासन प्रणालींशी त्याची जोडणी करून मसुदा तयार करणे, भाषांतर, सारांश, ज्ञानसंकलन आणि लाभार्थी पडताळणी यांसारख्या सुविधा अधिक सक्षम करण्यात येतील.

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह व राज्य सूचना माहिती अधिकारी व उपमहासंचालक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र सपना कपूर यांनी महा एआय प्लॅटफॉर्मबाबत सादरीकरण केले.

# रोह्यात भारत गॅस एजन्सी गैरसोयीबाबत ग्राहकांची नाराजी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा शहरासह परिसरातील अनेक गावांमधून भारत गॅस एजन्सीच्या सेवेसाठी येणाऱ्या ग्राहकांना सध्या मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे. विशेषतः मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर वयोवृद्ध नागरिक, महिला वर्ग आणि ग्रामीण भागातून येणाऱ्या ग्राहकांची अक्षरशः दमछाक होत आहे.



गॅस सिलेंडर घेण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना चिखलातून वाट काढत रांगेत उभे राहावे लागत आहे. आधीच बाजारपेठेच्या मागील बाजूस घाणीचे साम्राज्य पसरलेले असताना, दुर्गंधीयुक्त वातावरणात अनेकांना नाकावर रुमाल किंवा फडके धरून प्रतीक्षा करावी लागत असल्याची खंत ग्राहकांकडून व्यक्त होत आहे. ही परिस्थिती केवळ गैरसोयीची नसून नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही चिंताजनक ठरत आहे.

गॅस ही दैनंदिन जीवनातील अत्यावश्यक सेवा असल्याने ग्राहकांना अशा प्रकारचा त्रास सहन करावा लागणे दुर्दैवी असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. पावसाळ्यातील परिस्थितीचा विचार करून संबंधित एजन्सी प्रशासनाने तातडीने पर्यायी व्यवस्था उभारणे गरजेचे असल्याचे मतही व्यक्त होत आहे. ग्राहकांना उभे राहण्यासाठी सुरक्षित व स्वच्छ जागा, चिखलमुक्त मार्ग तसेच आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही एजन्सीची जबाबदारी असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

याबाबत तालुका पुरवठा अधिकारी हेमलता कुरसुगे यांनी सांगितले की, संबंधित गॅस एजन्सीला ग्राहकांची गैरसोय होणार नाही याबाबत सूचना देण्यात येणार आहेत. परिसराची स्वच्छता राखणे, ग्राहकांसाठी पावसापासून संरक्षण मिळावे यासाठी निवारा शेड उभारणे तसेच आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत एजन्सीला निर्देश दिले जाणार आहेत. पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीची दखल घेऊन ग्राहकांना कमीत कमी त्रास होईल याची दक्षता प्रशासनाकडून घेतली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

भाजप धाटाव विभाग अध्यक्ष सचिन मोरे यांनी भारत गॅस एजन्सीसमोरील ग्राहकांच्या गैरसोयीबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ते म्हणाले, संबंधित गॅस एजन्सीने ग्राहकांच्या सोयीसाठी तातडीने निवारा शेड, स्वच्छ परिसर, बसण्याची व्यवस्था आणि चिखलमुक्त मार्ग उपलब्ध करून द्यावा. ग्राहकांना सन्मानपूर्वक सेवा मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. प्रशासनानेही या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात.

# एसटी कर्मचाऱ्यांना महागाई, घरभाडे भत्ता, वार्षिक वेतनवाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राची जीवनवाहिनी असलेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) सुमारे ८६ हजार कर्मचाऱ्यांसाठी महायुती सरकारने ऐतिहासिक निर्णय घेतला असून, राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणेच एसटी कर्मचाऱ्यांनाही महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि वार्षिक वेतनवाढीत वाढ मंजूर करण्यात आली आहे, अशी घोषणा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी विधिमंडळात केली.



ते पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा ताई पवार यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने कर्मचाऱ्यांच्या भावना आणि न्याय्य अपेक्षांचा आदर करून हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यानुसार महागाई भत्ता ५३ टक्क्यांवरून ५८ टक्के, घरभाडे भत्ता ८-१६-२४ टक्क्यांवरून १०-२०-३० टक्के आणि वार्षिक वेतनवाढीचा दर २ टक्क्यांवरून ३ टक्के करण्यात आला आहे.

या निर्णयामुळे एसटी महामंडळावर दरमहा सुमारे ४५ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार असला, तरी कर्मचाऱ्यांचे मनोबल उंचावणे आणि त्यांच्या न्याय्य हक्कांना मान्यता देणे अधिक महत्त्वाचे असल्याचे सरनाईक यांनी स्पष्ट केले. तसेच महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, वार्षिक वेतनवाढीची थकबाकी आणि इतर वैधानिक देणी मिळून सुमारे ५,६४९ कोटी रुपयांची देयके अदा करण्यासाठी शासन भविष्यात आवश्यक ते प्रयत्न करेल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

आजचा निर्णय हा केवळ वेतनवाढीचा नाही, तर विश्वास, सन्मान आणि मानवी संवेदनांचा विजय आहे. एसटीच्या प्रत्येक चालक, वाहक, तांत्रिक कर्मचारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कष्टांचा शासनाने केलेला हा योग्य गौरव आहे. कर्मचारी समाधानी असतील, तरच लालपरी अधिक सक्षमपणे, अधिक विश्वासाने आणि अधिक कार्यक्षमतेने महाराष्ट्राच्या प्रत्येक गावापर्यंत धावेल," असा विश्वास व्यक्त करत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटीला आर्थिकदृष्ट्या सक्षम, आधुनिक आणि अधिक प्रवासी-केंद्रित संस्था बनविण्याचा शासनाचा निर्धार पुन्हा अधोरेखित केला.

# रायगड जिल्ह्यात दमदार पाऊस; शेतकरी सुखावला


**रोहा : प्रतिनिधी**

पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना अखेर पावसाने दिलासा दिला असून जूनच्या तिसऱ्या आठवड्यात म्हणजे २१ जून पासून पावसाने रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात बरसण्यास सुरुवात केली आहे. मंगळवारी रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात दमदार पाऊस पडल्याने शेतकरी सुखावला आहे. शेतीच्या कामाला वेग आल्याचे दिसून येत आहे.

जून महिन्याचे तीन आठवडे पूर्ण होत असताना सुद्धा पाऊस येत नसल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला होता. परंतु रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात २२ जून पासून पावसाने सुरुवात केली आहे. रविवारी सुरू केलेल्या पावसाने मंगळवारी दुपानंतर मात्र दमदारपणे पडत असल्याचे चित्र दिसून आले आहे. त्यामुळे संपूर्ण वातावरण पाऊसमय झाल्याचे चित्र होते. उकड्याने हैरान झालेल्या नागरिकांना आलेल्या पावसामुळे दिलासा मिळाला असून वातावरणात गारवा निर्माण झाला आहे.

रोहा तालुक्यात शेतकऱ्याने भातशेतीची पूर्ण तयारी केली होती. शेतातील कामे पूर्णत्वास जात असताना पावसाच्या प्रतीक्षेत शेतकरी होता. पावसाने आता सुरुवात केल्याने शेतकरी समाधानी झाला आहे.





**माथेरान : जागतिक दर्जाच्या पर्यटनस्थळी पावसाळ्यात निसर्ग खुलत असतो. गर्द झाडी, धुक्याची चादर आणि शरीराला झोंबणारा गार वारा यामुळे पावसाळ्यातही पर्यटन अधिक खुलते. माथेरान आणि मिनीट्रेन हे समीकरण घट्ट आहे. निसर्गरम्य वातावरणात धावणारी मिनीट्रेन सर्वांना जिव्हाळ्याची वाटते. पावसाळ्यात मिनीट्रेन स्थानकात येत असताना संतोष खाडे यांनी टिपलेले सुंदर छायाचित्र.**

# पावसामुळे नागरिकांना उकाड्यापासून दिलासा

**नागोठणे :** दरवर्षी साधारणतः ७ जूनच्या सुमारास हजेरी लावणाऱ्या मान्सूनने यंदा तब्बल १६ दिवस उशिरा म्हणजेच २३ जून रोजी नागोठणे परिसरात दमदार आगमन केले. गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या तापमानामुळे आणि हवेत असलेल्या प्रचंड उष्णतेमुळे नागोठणेकर नागरिक अक्षरशः हैराण झाले होते. उकाडा आणि दमट वातावरणामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच कामगार वर्गाला मोठा त्रास सहन करावा लागत होता. मात्र सोमवार दि. २२ जून रोजी सायंकाळी अचानक काळ्या ढगांनी आकाश व्यापले आणि जोरदार सरी कोसळण्यास सुरुवात झाली.

पान १ वरुन

## महिला व बालकांवरील अत्याचार रोखण्यासाठी राज्य सरकारकडून व्यापक उपाययोजना -मुख्यमंत्री

महिला व बाल अपराध प्रतिबंध विभागाच्या अहवालानुसार सन २०२४च्या तुलनेत सन २०२५मध्ये बालकांवरील अत्याचारात ४८२ने वाढ झालेली आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो (एनसीआरबी) सन २०२४चा अहवाल माहे एप्रिल २०२६मध्ये प्रकाशित झाला असून यामध्ये सन २०२४ची आकडेवारी देण्यात आलेली आहे. या अहवालानुसार महाराष्ट्रामध्ये एकूण महिला अत्याचारासंबंधी दाखल गुन्ह्यांची संख्या ४७,९५४ इतकी असून दाखल गुन्ह्यांच्या संख्येनुसार महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. तथापि, एनसीआरबीच्या मार्गदर्शक तत्वानुसार दाखल गुन्ह्यांची जास्त संख्या लोकसंख्येमुळे दिसुन येते व गुन्हेगारीमध्ये वाढ झाल्याचे दर्शवित नाही; तर त्यामध्ये सुधारित पोलीस यंत्रणा, उत्तम ई-एफआयआर सुविधा आणि तक्रार नोंदविण्यासाठी महिलांमध्ये वाढलेली जागरूकता दिसून येते तसेच कोल्हापूर परिक्षेत्रात सन २०२४ व सन २०२५ या गेल्या दोन वर्षांत महिला अत्याचाराच्या २३६२ व विनयभंगाच्या ४४८५ घटना घडल्या आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यात सन २०२२ ते सन २०२५ या मागील चार वर्षात अल्पवयीन मुलींवर अत्याचाराच्या ६४१ घटना घडल्या असून चालू वर्षात माहे जानेवारी ते माहे मार्च २०२६पर्यंत ४१ घटना घडल्या आहेत.

राज्यात बालकांचे खून, अपहरण व लैंगिक अत्याचाराच्या घटना घडू नयेत म्हणून राज्य शासनामार्फत वेळोवेळी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येतात तसेच अशा प्रकारच्या घटना घडल्या तर याबाबत तत्काळ कायदेशीर कारवाई करण्यात येते. बदलापूर येथील शाळकरी मुलीवरील अत्याचार प्रकरणी पोलीस स्टेशन बदलापूर पश्चिम येथे गु.र.क्र. २२/२०२६नुसार २२ जानेवारी २०२६ रोजी गुन्हा दाखल केला असून २८ फेब्रुवारी २०२६ रोजी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे तसेच पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथील चिमुरडीवर झालेल्या अत्याचार प्रकरणी राजगड पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.१६९/२०२६नुसार २ मे २०२६ रोजी गुन्हा दाखल केला असून १६ मे २०२६ रोजी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. १ जुलै २०२४पासून देशात भारतीय न्याय संहिता लागू झाल्याने भारतीय दंड संहिता व फौजदारी प्रक्रिया संहिता हे कायदे अधिक्रमित झाले आहेत. त्या अनुषंगाने शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२०मधील तरतुदींचा नवीन फौजदारी कायद्यांशी तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी २५ जून २०२५च्या शासन निर्णयान्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. या समितीच्या शिफारसीस अनुसरून आवश्यक राज्य सुधारणा करण्यात आल्या आहेत. राज्यात महिला व बालकांवरील अत्याचारांना प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यामध्ये महिला व बालकांवरील अत्याचारांना प्रतिबंध करणे व त्यानुषंगाने इतर अनुषंगिक कारवाई करण्यासाठी अपर पोलीस महासंचालक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग हा स्वतंत्र विभाग कार्यरत करण्यात आला आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले आहे.

महिलांविषयीच्या गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी सर्व पोलीस घटकांमध्ये पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक यांच्या अधिपत्याखाली स्वतंत्र पोलीस तपास पथकाची स्थापना करण्यात आलेली आहे. महिलांवरील होणाऱ्या अत्याचारांना प्रतिबंध करण्यासाठी राज्यातील सर्व पोलीस घटकांमध्ये एकूण ५१ भरोसा सेलची स्थापना करण्यात आली आहे. पोलीस स्टेशनमध्ये तक्रार घेऊन येणाऱ्या महिलांना सौजन्याची वागणूक देणे, महिलांकडून प्राप्त तक्रारींची विनाविलंब दखल घेणे, पीडित महिला व मुलींच्या तक्रारी हाताळण्यासाठी समाजातील विविध घटकांचे सहकार्य घेणे याकरीता सर्व पोलीस आयुक्तालय/पोलीस अधीक्षक तसेच पोलीस स्टेशन स्तरावर महिला दक्षता समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

महिला व मुलींवरील अत्याचारास प्रतिबंध करण्याकरिता पोलिसांमार्फत गस्त घालण्यात येते. या अंतर्गत निर्भया, दामिनी, पोलीस काका, पोलीस दिदी व बडी कॉप या उपाययोजना करण्यात येतात तसेच या पथकांमार्फत प्रत्यक्ष भेटी देऊन समुपदेशन, मार्गदर्शन व जनजागृती करण्यात येते. महिला हेल्पलाईन क्रमांक १०३ व १०९१, बालकांसाठी हेल्पलाईन क्रमांक १०९८, इमर्जन्सी हेल्पलाईन क्रमांक ११२ कार्यरत असून त्याव्दारे महिलांना व बालकांना २४x७ मदत देण्यात येते. महिला व बाल विकास विभागाच्या वतीने अत्याचार पीडित महिला व बालकांना समुपदेशनाकरिता राज्यात १२४ महिला विशेष समुपदेशन केंद्र कार्यरत आहेत. महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे निकाली काढण्याकरिता एकूण ५८ जलदगती न्यायालयांची स्थापना करण्यात आलेली आहे. लैंगिक अत्याचार व ॲसिड हल्ल्यातील पीडित महिला व बालकांना वित्तीय सहाय्य व कायदेशीर मदत देण्यासाठी मनोधैर्य योजना सुरू करण्यात आली आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी लेखी उत्तरात सांगितले.

## राज्यातील जलप्रदूषणाच्या प्रश्नावर विधिमंडळात आवाज

राज्यातील एक लाख ३४ हजारांहून अधिक उद्योगांपैकी ९,८९१ उद्योग औद्योगिक सांडपाणी निर्माण करतात. या उद्योगांकडून दररोज ३,५०६ दशलक्ष लिटर सांडपाणी निर्माण होत असून सर्व प्रदूषणकारी उद्योगांना प्राथमिक, द्वितीय किंवा तृतीय स्तरावरील सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारणे बंधनकारक करण्यात आले आहे तसेच राज्यात २६ सामायिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (सीईटीपी) कार्यरत असून त्यांच्यामार्फत दररोज २२३.८५ दशलक्ष लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते, अशी माहिती त्यांनी दिली.

मासे मृत्यूच्या घटनांबाबत शासनाने सांगितले की, सोलापूर येथील सिद्धेश्वर तलाव, छत्रपती संभाजी (कंबर) तलाव आणि यमाई तलाव येथे मासे मृत्यूच्या घटना निदर्शनास आल्या होत्या. या घटनांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पाहणी करण्यात आली असून संबंधित स्थानिक संस्थांना नोटिसा व समजपत्रे देण्यात आली आहेत. पाण्यातील विरघळलेल्या ऑक्सिजनचे प्रमाण कमी झाल्यामुळे या घटना घडल्याचे अहवालातून स्पष्ट झाले आहे. पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील औद्योगिक सांडपाण्यामुळे उजनी धरण प्रदूषित झाल्याच्या आरोपांबाबत शासनाने ते दावे फेटाळले. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार उजनी धरणातील लोह, मॅंगनीज, शिसे, कॅडमियम आणि पारा यांचे प्रमाण निर्धारित मर्यादेत असल्याचे नमूद करण्यात आले. त्याचप्रमाणे धरणाच्या पाण्याचा सरासरी पीएच २०२५मध्ये ८.५ आणि २०२६ मध्ये ८.३४ इतका नोंदविण्यात आला असून तो चिंताजनक पातळीवर नसल्याचे सांगण्यात आले.

प्रदूषण नियंत्रणासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मे २०२६पर्यंत २५५ उद्योगांना कारणे दाखवा नोटीस, ८४९ उद्योगांना प्रस्तावित निर्देश, ३१९ उद्योगांना अंतरिम निर्देश, तर ४७ उद्योगांना उत्पादन बंदीचे आदेश दिले आहेत. याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांनाही सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनासाठी निधी राखून ठेवणे बंधनकारक करण्यात आले असून राज्यातील नद्यांचे प्रदूषण कमी करून त्यांचे पुनरूज्जीवन करण्यासाठी २७ एप्रिल २०२६ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य नदी पुनरूज्जीवन प्राधिकरण स्थापन करण्यात आल्याची माहितीही मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.

## दिव्यांग शाळांच्या नूतनीकरण विलंबाचा मुद्दा मांडला

पोर्टल पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होईपर्यंत ई-ऑफिस प्रणालीद्वारे नूतनीकरण प्रस्तावांवर निर्णय घेण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

सद्यस्थितीत प्राप्त झालेल्या २७९ नूतनीकरण प्रस्तावांपैकी २४९ प्रस्ताव निकाली काढण्यात आले असून उर्वरित ३० प्रस्ताव तसेच जिल्हा समित्यांकडून प्राप्त होणारी प्रकरणे तातडीने निकाली काढण्याची प्रक्रिया सुरू आहे, अशी माहिती त्यांनी दिली तसेच अनुदानित दिव्यांग संस्थांमधील मान्यताप्राप्त कर्मचाऱ्यांचे वेतन जून २०२६पर्यंत अदा करण्याबाबत सर्व जिल्हा कार्यालयांना निर्देश देण्यात आले आहेत, असेही मंत्री सावे यांनी उत्तरात नमूद केले.

दरम्यान, महाराष्ट्र दिव्यांग सहाय्यक पोर्टलमधील तांत्रिक त्रुटी दूर होईपर्यंत नूतनीकरणाची प्रक्रिया ऑफलाइन पद्धतीने राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला असून उर्वरित प्रस्ताव तातडीने मंजूर करण्यासाठी कार्यवाही सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

# निसरड्या रस्त्यामुळे वाहनांचे अपघात



**अलिबाग : प्रतिनिधी**

दोन दिवस पडत असलेल्या समाधानकारक पावसामुळे हेवेत गारवा निर्माण झाल्यामुळे रायगडकरांना दिलासा मिळाला आहे. परंतु रस्ते निसरडे झाल्यामुळे अपघात घडले आहेत.

पावसामुळे अलिबाग तालुक्यातील जांभूळपाडा -जलपाडा मार्गावर मंगळवारी सकाळी अनेक वाहनांचा अपघात झाला. निसरड्या रस्त्यामुळे वाहन चालकांना वाहनावर नियंत्रण ठेवता आले नाही,परिणामी वाहने रस्त्याकडेला सरकली. त्यात एसटी बसचा ही समावेश होता.

सोमवारी रात्री तालुक्यात सर्वत्र पाऊस पडला. अलिबाग तालुक्यात कारलेखिंड ते रेवस मार्गावर काही ठिकाणी सिमेंटच्या रस्त्याचे कामदेखील सुरू आहे. सकाळी या मार्गावर अचानक चार ते पाच वाहनांचा अचानक अपघात झाला. त्यात एक एसटी,टेम्पो, आणि अन्य वाहनाचा समावेश होता.

एसटीची गाडी रस्त्या कडेला सरकली तर टेम्पो झाडावर जाऊन आदळला. वाहन चालकांचे या निसरड्या रस्त्यावर नियंत्रण सुटल्याने हे अपघात घडले. रस्त्यावर माती,चिखल नसताना, हा रस्ता निसरडा कसा झाला असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. या अपघातामुळे काही काळ वाहतूक कोंडी झाली होती.

# पनवेल महानगरपालिका तयार करणार शहर हवामान कृती योजना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरासाठी "शहर हवामान कृती योजना" तयार करण्याकरिता त्रयस्थ संस्थेच्या नियुक्तीबाबत मंगळवारी झालेल्या महानगरपालिकेच्या महासभेत मंजूरी देण्यात आली. प्रभाग समित्या स्थापन करण्यास व वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करण्यास मंजूरी देण्यात आली.






पनवेल महानगरपालिकेची महासभा आज दिनांक २३ जून रोजी महापालिकेच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये संपन्न झाली. महापौर नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही महासभा घेण्यात आली. यावेळी मंचावर उपमहापौर प्रमिला पाटील, अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, महापालिका सचिव नानासाहेब कामठे, उपसचिव अक्षय कदम उपस्थित होते. तर सभागृहात सभागृह नेते प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला बालकल्याण समिती सभापती ममता म्हात्रे, विरोधी पक्ष नेते अरविंद म्हात्रे तसेच महापालिका सदस्य उपस्थित होते. तसेच महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिकेकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २९ (अ) नुसार प्रभाग समित्या स्थापन करण्याच्या विषयावर चर्चा करुन विषय मंजूर करण्यात आला. पनवेल शहरासाठी "शहर हवामान कृती योजना" तयार करण्याकरिता त्रयस्थ संस्थेच्या नियुक्तीबाबत या कामाकरिता रुपये ६४,००,०००/- (रुपये चौसष्ठ लाख मात्र) (GST सह) रक्कमेच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबतचचा विषय मंजूर करण्यात आला. या विषयावरील माहितीचे सादरीकरण करण्याबाबत यावेळी सूचना देण्यात आल्या.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ड, प्रभाग क्र.१९ मधील अं.भु.क्र.५०६ कोळीवाडा मार्केड यार्ड परिसरातील स्मशानभूमी विकसीत करणे. या कामाच्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबतचा विषय स्थागित करण्यात आला. पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर येथील से. १२, भुखंड क्र.०१ या उद्यानाचे नुतनीकरण करण्याचा विषय महासभेत मंजूर करण्यात आला. पनवेल महानगरपालिका क्षेत्रासाठी वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करण्याबाबतचा विषयास मंजुरी देण्यात आली. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.२० भिंगारी गावामधील अंतर्गत पावसाळी गटारींचे बांधकाम करण्याचा विषय सर्वानुमते मंजूर करण्यात आला. पनवेल महानगरपालिकेकरीता वाहने वाहनचालकासह भाडेतत्वावर पुरवठा करणे या कामाची ई निविदा मागविणेस मान्यता.

देहरंग येथे पाणी साठवणाकरीता बॅरेज बांधणे प्रस्ताव केंद्र शासनाच्या अर्बन चॅलेंज फंडस् अंतर्गत प्रशासकीय मान्यतेकरीता सादर करणेबाबतचा विषय महासभेत मंजूर करण्यात आला. नवीन मुख्यालय इमारती समोरील रस्त्यावर डेकोरेटीव्ह पथदिप खांब उभारुन कार्यान्वित करण्याचा विषय मंजूर करण्यात आला.

## मालडुंगे ग्रामपंचायत हद्दीत वीज तार तुटल्याने दोन गायी, एक बैलाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

मालडुंगे ग्रामपंचायत हद्दीत रात्री उशिरा विजेची तार तुटून पडल्याने २ गायी व १ बैल अशा तीन जनावरांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच मालडुंगे ग्रामपंचायतीचे सरपंच सिताराम चौधरी, उपसरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, महावितरण चे अधिकारी तसेच पनवेल तहसील कार्यालयातील महसूल विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. अधिकाऱ्यांनी मृत जनावरांची पाहणी करून पंचनामा केला. यावेळी सरपंच सिताराम चौधरी यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरत परिसरातील जीर्ण व धोकादायक वीज तारा आणि देखभालीअभावी वारंवार निर्माण होणाऱ्या समस्यांबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. अशा निष्काळजीपणामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून भविष्यात मानवी जीवितासही धोका निर्माण होऊ शकतो, असे त्यांनी सांगितले.



ग्रामस्थांनी मृत जनावरांच्या मालकांना तत्काळ आर्थिक मदत व नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे तसेच परिसरातील सर्व धोकादायक वीज तारा आणि खांबांची त्वरित तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करण्याची मागणीही करण्यात आली आहे. या घटनेमुळे महावितरणच्या कामकाजाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## करंजाडे ग्रामपंचायतीकडून दिव्यांगांना आर्थिक निधी सहाय्य भत्ता वाटप

**करंजाडे : रामप्रहर वृत्त**

करंजाडे ग्रुप ग्रामपंचायतीच्या वतीने दिव्यांग कल्याण योजनेअंतर्गत दिव्यांग बांधवांना आर्थिक सहाय्य स्वरूपातील निर्वाह भत्ता वाटप कार्यक्रम मंगळवार, दि. २३ जून रोजी जिल्हा परिषद शाळा, करंजाडे येथे आयोजित करण्यात आला होता.



अपंगत्वामुळे कोणत्याही प्रकारचा व्यवसाय अथवा नियमित रोजगार करता येत नसल्याने अनेक दिव्यांगांना उदरनिर्वाहासाठी आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर त्यांच्या दैनंदिन गरजांना हातभार लागावा आणि आर्थिक आधार मिळावा या उद्देशाने ग्रामपंचायतीमार्फत आर्थिक सहाय्य भत्ता वितरित करण्यात आला.

या उपक्रमाचा एकूण ४० दिव्यांग लाभार्थ्यांनी लाभ घेतला. या कार्यक्रमाला करंजाडे ग्रुप ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंच मंगेश शेलार, करंजाडे विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, ज्येष्ठ मार्गदर्शक मारुती पोपट, ग्रामपंचायत सदस्य सुरज कर्णा शेलार, बिपीन गायकवाड, देवपू वाघे, प्रीती शहारे, ग्रामसेविका मनीषा जायभाये, तसेच नम्रता गायकर, गणेश कदम उपस्थित होते.

## खारघरमध्ये डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांचा बलिदान दिन साजरा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टीच्या जिल्हा व प्रदेश कार्यकारिणीच्या सूचनेनुसार सालाबादप्रमाणे यंदाही खारघर मंडळात भारतीय जनसंघाचे संस्थापक, प्रखर राष्ट्रवादी नेते डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांची पुण्यतिथी बलिदान दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली.



खारघर येथील भाजपा जनसंपर्क कार्यालयात आयोजित कार्यक्रमात खारघर मंडळाचे फ्रेंड्स ऑफ बीजेपीचे संयोजक प्रभाकर तिजारे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. मंडळाचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर खरपूरिया यांनी डॉ. मुखर्जी यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात केली.

यावेळी प्रमुख वक्ते प्रभाकर तिजारे यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणातून सांस्कृतिक राष्ट्रवाद तसेच पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या एकात्म मानवतावाद या विचारसरणीवर सखोल मार्गदर्शन केले.

मंडळाचे उपाध्यक्ष ॲड. अमर उपाध्याय त्यांच्या संपूर्ण जीवनकार्याचा आढावा उपस्थितांसमोर मांडला. सरचिटणीस दीपक शिंदे यांनी आभार मानले या कार्यक्रमास महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार, युवा मोर्चा अध्यक्ष प्रवीण बेरा, जिल्ह्याचे माजी चिटणीस ब्रिजेश पटेल, कीर्ती नवघरे, हर्षदा उपाध्याय, संध्या शारबिद्रे, बीना गोगरी, ॲड. अमर उपाध्याय,अश्विनी भुवड, प्रभाग ६ अध्यक्ष रामचंद्र पाटील, सोशल मीडिया अध्यक्ष आनंद ज्ञाने, दीपक ठाकूर, सुरज पाटील, प्रथम पाटील, कृष्णा बेहरा, विश्वनाथ इंडी, सुशीला शर्मा, झुमा चक्रवर्ती, अनिता जाधव, तुकाराम कंटाळे, पप्पू खामकर यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निवडक

### रिक्षाची ट्रेलरला धडक, दोघी जखमी

**नवीन पनवेल :** ट्रेलर हवेचा पाईप अचानकपणे निघाल्याने त्यांनी ट्रेलर रस्त्यावर ब्रेक लावून उभा ठेवला होता. २१ जून रोजी दुपारी पावणेतीनच्या सुमारास पनवेल ते गव्हाण फाटा रोडवर जेएसडब्ल्यू कंपनीच्या समोर रिक्षा चालकाने रिक्षा भरधाव वेगाने चालवली आणि बंद पडलेल्या ट्रेलरला पाठीमागून ठोकर मारून अपघात केला. या अपघातात रिक्षेत बसलेल्या दोन प्रवासी महिला गंभीर जखमी झाल्या. या प्रकरणी रिक्षा चालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

### पोलिसांकडून बारवर कारवाई

**नवीन पनवेल :** बारमध्ये अंगप्रदर्शन करून अश्लील हावभाव केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात २२ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. कोन येथील हॉटेल गोल्डन नाईट बार अँड रेस्टॉरंट, ऑर्केस्ट्रा येथे महिलांनी अंगात तोकडे कपडे घालून अंगप्रदर्शन केले आणि अश्लील हावभाव करताना तसेच ग्राहकांशी शारीरिक लगट करताना दिसून आल्या. यावेळी बार मधील मॅनेजर आणि पुरुष वेटर हे त्यांना उत्तेजन आणि प्रोत्साहन देत असताना मिळून आले. तालुका पोलीस ठाण्यात महिला, मॅनेजर, वेटर आणि बारमालक यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

### अल्पवयीन मुलगी गर्भवती; आरोपीवर गुन्हा

**नवीन पनवेल :** १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून ती सहा आठवड्यांची गरोदर राहिल्याप्रकरणी आरोपी आशिक किसन जाधव (राहणार सेक्टर १९ मुर्बी गाव, खारघर) याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात २१ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील पीडित १७ वर्षीय तरुणी खारघर परिसरात राहत असून १५ एप्रिल ते जून पर्यंत आरोपीने तिच्यासोबत जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. यात पीडित तरुणी सहा आठवड्यांची गरोदर राहिली. याची माहिती नातेवाईकांना दिल्यानंतर आरोपी विरोधात खारघर पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

### पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र म्हात्रेंची बदली

**पनवेल :** पनवेल तालुका पोलीस ठाण्यात कार्यरत



असणारे राष्ट्रपती पदक प्राप्त उपनिरीक्षक जितेंद्र म्हात्रे यांची नवी मुंबई गुन्हे अन्वेषण शाखेत बदली करण्यात आली आहे. म्हात्रे यांनी आपल्या पोलीस कारकिर्दीमध्ये मोठ्या प्रमाणात गुन्हे उघडकीस आणण्यास भरीव कामगिरी केली आहे.


### पनवेल मध्ये मोसमी पावसाची बरसात

**पनवेल :** अनेक दिवसांच्या प्रतीक्षेत असलेला मोसमी पाऊस आज कळंबोलीसह पनवेल मध्ये चांगलाच बरसला. सकाळपासून वातावरणामध्ये ढग दाटून आले होते व अंधकारमय वातावरण ही निर्माण झाले होते. दुपारी एक वाजण्याच्या सुमारापासून दमदारपणे मोसमी पावसाने चांगलं बरसून उन्हाच्या काहीलीने त्रस्त झालेल्यांना गारेगार करून टाकले.

## भाताणपाडाच्या विकासाला 'अमिटी'ची साथ

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाताण आणि भाताणपाडा गावांच्या विकासात अमिटी युनिव्हर्सिटी मुंबईने गेल्या दशकात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. विद्यापीठाच्या आगमनानंतर रस्ते, ड्रेनेज, शाळा इमारत, पेव्हर ब्लॉक यांसारख्या विविध विकासकामांना गती मिळाली असून परिसराचा चेहरामोहरा बदलला आहे.




निसर्गरम्य वातावरणात वसलेल्या अमिटी विद्यापीठामुळे केवळ स्थानिक विकासालाच चालना मिळाली नाही, तर देश-विदेशातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. उत्कृष्ट शैक्षणिक वातावरण, आधुनिक सुविधांमुळे विद्यार्थ्यांमध्ये उच्च शिक्षणाची आवड निर्माण झाली असून या परिसराला शैक्षणिक क्षेत्रात एक वेगळी ओळख मिळाली आहे. अमिटी विद्यापीठामुळे स्थानिक युवक-युवतींसाठी रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. सिक्युरिटी, हाऊसकिपिंग, कॅन्टीन, वाहतूक, गार्डनिंग आणि इतर सेवांमध्ये स्थानिकांना प्राधान्य देण्यात आले असून सुमारे २५० ते ३०० युवक-युवती कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांच्या वाहतुकीमुळे १०० हून अधिक रिक्षाचालकांनाही नियमित रोजगार मिळत आहे. तसेच मेस, घरभाडे, डबे पुरवठा आणि इतर पूरक व्यवसायांनाही मोठी चालना मिळाली आहे.

अमिटी विद्यापीठाकडून दरवर्षी ग्रामपंचायतीला सुमारे ३५ लाख रुपयांचा कर प्राप्त होत असून या निधीतून गावातील विविध विकासकामांना आर्थिक बळ मिळत आहे. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून रस्ते, मूलभूत सुविधा, इतर विकास प्रकल्प राबविण्यास या उत्पन्नाचा मोठा हातभार लागत असल्याचे ग्रामस्थांकडून सांगितले जाते. महाराष्ट्र शासनाने अमिटी विद्यापीठाच्या कॅम्पस विस्तारासाठी रितनंद बलवेद एज्युकेशन फाउंडेशनला १५ एकर जमीन मंजूर केली आहे. या विस्तारामुळे नवीन शैक्षणिक सुविधा, रोजगाराच्या अधिक संधी आणि परिसराच्या आर्थिक विकासाला आणखी गती मिळणार असल्याचे बोलले जात आहे. गेल्या दहा वर्षांत शिक्षण, रोजगार आणि विकास यांचा समतोल साधत अमिटी विद्यापीठ भाताणभाताणपाडा परिसराच्या प्रगतीचे महत्त्वाचे केंद्र बनले असून, ग्रामपंचायतीला मिळणारे वार्षिक कर उत्पन्न, स्थानिकांना मिळणारा रोजगार आणि प्रस्तावित विस्तार यामुळे या विकासगाथेला आणखी नवी उंची मिळणार आहे.

## दोन ट्रकच्या मध्ये दबून चालकाचा मृत्यू

**नवीन पनवेल :** दोन ट्रकच्या मध्ये दबल्याने चालकाचा मृत्यू झाल्याची घटना पाडेघर जवळ घडली. या प्रकरणी ट्रक चालका विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. रजनीश यादव यांनी ट्रक पनवेल जेएनपीटी सर्विस रोड केके लॉजिस्टिकच्या बाजूला उभा करून ते ट्रकची पाहणी करत होते. यावेळी त्यांच्या पाठीमागे आलेल्या ट्रक चालकाने त्याच्या ताब्यातील ट्रक हा देखील उभा करून तो खाली उतरला होता. यावेळेस अंशू शंकरलाल यादव (१७) हा ट्रकची पाहणी करण्यासाठी पाठीमागील बाजूला गेला. यावेळी पाठीमागे उभा असलेला ट्रकचा हॅन्ड ब्रेक न न लावल्याने ट्रक पुढे आला आणि अंशू यादव हा दोन्ही ट्रकच्यामध्ये दबून गंभीर जखमी झाला. आणि त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी ट्रकचालक जगदीप देवेंद्र प्रसाद गुप्ता याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.





**भारतीय जनता पक्षाच्या खारघर शहर मंडळ कामगार आघाडीच्या संयोजकपदी मनेश पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी मंगळवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांचीही पाटील यांनी भेट घेऊन आशीर्वाद घेतले. यावेळी भाजप रायगड जिल्हा कामगार आघाडीचे संयोजक रवी नाईक, उत्तर भारतीय मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संतोष शर्मा, सेक्टर प्रमुख श्री बोदाई, आदेश ठाकूर आदी उपस्थित होते.**





**पनवेल :** भारतीय जनसंघाचे संस्थापक, थोर राष्ट्रीय नेते आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या पुण्यतिथीनिमित्त पनवेल येथील भाजप कार्यालयात अभिवादन कार्यक्रम पार पडला. यावेळी भाजपचे दक्षिण रायगड अध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, शहर चिटणिस रुपेश नागवेकर, जयदिप भगत, शंकर म्हात्रे, सुनील पाटील, विनेश कदम, यतीन पाटील, अशोक आंबेकर, हेमंत माने तसेच इतर पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी डॉ. मुखर्जी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. उपस्थितांनी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी देशाच्या एकात्मतेसाठी, शिक्षण क्षेत्रातील विकासासाठी आणि राष्ट्रहितासाठी दिलेल्या योगदानाचे स्मरण करत त्यांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमात त्यांच्या कार्याचा गौरव करत राष्ट्रसेवा आणि जनकल्याणासाठी समर्पित राहण्याचे आवाहन करण्यात आले.

## संपादकीय


# चालण्याचा अधिकार

विकासावर भर देताना सर्वसामान्य पादचारीही दुर्लक्षित राहता कामा नये हे योग्यच आहे. पदपथांवरील अतिक्रमणे, उघडी गटारे आणि वाहनांच्या पार्किंगचा विळखा यामुळे पादचाऱ्यांचे चालणे हे अनेक ठिकाणी जिकिरीचे आणि धोकादायक बनले आहे. अशा परिस्थितीत सर्वोच्च न्यायालयाने दिलेला "चालण्याचा अधिकार हा मूलभूत अधिकार आहे" हा निर्णय अत्यंत स्वागतार्ह ठरतो.

**सर्वोच्च न्यायालयाने अलीकडेच दिलेला "चालण्याचा अधिकार हा नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे" हा निर्णय भारतीय नागरी जीवनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचाच म्हटला पाहिजे. भारताच्या शहरांमध्ये आणि ग्रामीण भागांतही गेल्या काही दशकांत रस्त्यांचे जाळे झपाट्याने वाढले आहे. उड्डाणपूल, द्रुतगती मार्ग, चौपदरी आणि सहापदरी महामार्ग यांवर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक झाली आहे आणि ती विकासाच्या दृष्टीने आवश्यकही आहे. मात्र शहरांमध्ये वाहनांची संख्या वाढत असताना पादचाऱ्यांना सुरक्षित जागा उपलब्ध करून देणे ही लोककल्याणकारी राज्याची जबाबदारी ठरते. न्यायालयाने या अधिकाराला संविधानिक संरक्षण देऊन प्रशासनाला अधिक उत्तरदायी बनवले आहे. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की नागरिकांना सुरक्षितपणे चालता यावे यासाठी पदपथांची निर्मिती आणि देखभाल करणे ही स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका, नगरपालिका आणि इतर विकास प्राधिकरणांची जबाबदारी आहे. रस्ता असेल तर पदपथही असला पाहिजे हा संदेश या निर्णयातून दिला गेला आहे. विशेष म्हणजे पादचाऱ्यांचा अधिकार हा वाहनांच्या हालचालीपेक्षा प्राधान्याचा असल्याचे न्यायालयाने नमूद केले आहे. त्यामुळे वाहतूक नियोजनाच्या पारंपरिक दृष्टिकोनात मोठा बदल घडण्याची शक्यता आहे. न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले आहे की सुरक्षित आणि स्पष्टपणे आखून दिलेल्या पदपथांवर चालण्याचा अधिकार हा संविधानातील मूलभूत अधिकाराशी निगडित आहे. यापुढे पादचाऱ्यांचे हक्क हे मोटार वाहनांच्या सोयीपेक्षा दुय्यम मानले जाणार नाहीत असेही न्यायालयाने अधोरेखित केले आहे. एका पाच वर्षांच्या मुलाच्या पदपथावरील अपघाती मृत्यूप्रकरणी त्याच्या वडिलांनी नुकसानभरपाईचा दावा दाखल केला होता. त्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. हा निर्णय केवळ शहरी नियोजनापुरता मर्यादित नाही. तो मानवी प्रतिष्ठा, सुरक्षितता आणि सामाजिक समतेशीही संबंधित आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती आणि महिलांसाठी सुरक्षित पदपथ ही मूलभूत गरज आहे. देशातील काही शहरांची वस्तुस्थिती या संदर्भात चिंताजनक आहे. अनेक ठिकाणी पदपथ अतिक्रमणांच्या विळख्यात आहेत. काही भागांत पदपथच अस्तित्वात नाहीत. त्यामुळे नागरिकांना वाहनांच्या गर्दीतून जीव मुठीत धरून चालावे लागते. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे आता या समस्येकडे दुर्लक्ष होणार नाही. नागरिकांमध्येही आपल्या संबंधित अधिकाराविषयी अधिक जागरूकता निर्माण होऊ शकेल. या निर्णयाला केवळ न्यायालयीन आदेश म्हणून न पाहता व्यापक नागरी सुधारणा घडविण्याची संधी म्हणून स्वीकारले पाहिजे. इतर शहरी विकास कार्यक्रमांमध्ये पादचारी सुविधांना प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे. सुरक्षित पदपथ, दिव्यांगांसाठी सुलभ मार्ग, सायकल ट्रॅक आणि अतिक्रमणमुक्त सार्वजनिक जागा यांवर भर दिल्यास शहरांचे जीवनमान उंचावेल. विकासाचा खरा अर्थ केवळ वेगवान वाहनांमध्ये नसून प्रत्येक नागरिकाला सुरक्षितपणे चालता येणाऱ्या रस्त्यांमध्ये असतो. सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय नागरी विकासाला अधिक मानवी आणि समावेशक दिशा देणारा आहे. आता सगळ्यांनी मिळून या अधिकाराला प्रत्यक्षात उतरविण्याची जबाबदारी पार पाडली पाहिजे. सुरक्षित पदपथांवरून चालण्याचा अधिकार ही खऱ्या विकासाची आणि उत्तम जीवनशैलीची ओळख ठरेल.**

# भूमिपुत्रांचे कैवारी स्व. दि.बा. पाटील

भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्तांचे दैवत लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांचा आज स्मृतिदिन. त्यांनी आपले आयुष्य सर्वसामान्य जनतेसाठी वेचले. या लढवय्या नेत्याच्या कार्याचा घेतलेला आढावा...



१९७०च्या दरम्यान मुंबईवरील लोकसंख्येचा वाढत जाणारा भार कमी व्हावा यासाठी मुंबईला पर्याय म्हणून नवी मुंबई हे नवे शहर वसवण्याच्या दृष्टीने तत्कालीन महाराष्ट्र सरकारने पावले उचलण्यास सुरुवात केली. यासाठी १७ मार्च १९७० रोजी सिटी अ‍ॅण्ड इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (सिडको)ची स्थापना केली. या सिडकोने पनवेल, उरण आणि बेलापूर पट्ट्यातील ९५ गावातील ५० हजार एकर जमीन संपादनाचा निर्णय घेतला. इतकेच नव्हे, तर पुढे येऊ घातलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट म्हणजेच जेएनपीटीसाठीही सिडकोच्या माध्यमातून भूसंपादन केले जात होते.

मिठागरे आणि शेती हेच उदरनिर्वाहाची साधने असलेला या भागातील शेतकरी हवालदिल झाला. १५ हजार एकरी जमीन घेण्याच्या प्रयत्नात सिडको असताना दि.बा. पाटील यांनी एकरी ४० हजार रकमेची मागणी केली. 'दिबा' त्या काळी पनवेल–उरण भागातून आमदार होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी विधानसभेचे सभागृह दाणाणून सोडणारे नेते अशी ख्याती त्यांची होती. सिडकोच्या भूसंपादनामुळे भविष्यातील संकटाची जाणीव 'दिबां'ना झाली आणि त्यांनी ज्यांच्या जमिनी घेतल्या जाणार होत्या, त्यांच्यासाठी आंदोलनाची हाक दिली.

शेतकऱ्यांच्या मागणीला कुणीही दाद देईना. त्यामुळे १९८४च्या जानेवारीत जासई गावच्या हुतात्मा मैदानात मोठ्या संख्येत शेतकरी जमले. दि.बा. पाटील हे त्यांचे नेते होते. वसंतराव पाटील हे त्या वेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यांनी एकरामागे ४० हजार रुपये देण्याऐवजी २१ हजार रुपये देण्याचे मान्य केले. त्यानंतर २७ हजारापर्यंत आले. सरकारच्या मनमानीविरोधात उरण, पनवेल परिसरातील ५० हजारांहून अधिक शेतकरी दास्तान फाट्यावर जमा झाले. इथे जमीन संपादन करायला आलेल्या अधिकारी आणि पोलिसांसोबत शेतकऱ्यांचा संघर्ष झाला. त्या वेळी पोलिसांकडून करण्यात आलेल्या लाठीमार, गोळीबारात नामदेव घरत (चिर्ले), रघुनाथ ठाकूर (धुतूम), कमळाकर तांडेल (पागोटे), महादेव पाटील (पागोटे) आणि केशव पाटील या शेतकऱ्यांचा मृत्यू झाला.

या संघर्षानंतर राज्य सरकारने नमते घेत 'दिबां'शी चर्चा केली. 'दिबां'नी मांडलेली योजना पुढे केवळ रायगडकरांच्या नव्हे, तर अवघ्या महाराष्ट्रातील प्रकल्पग्रस्तांसाठी वरदान ठरली. ती योजना म्हणजे, साडेबारा टयांचा विकसित भूखंडाचा मोबदला. जासईच्या या आंदोलनामुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना साडेबारा टक्के योजनेंतर्गत विकसित भूखंड देण्याचा निर्णय ऑक्टोबर १९९४मध्ये झाला. म्हणजे एखाद्या शेतकऱ्याची जमीन भूसंपादनात गेल्यास त्या जमिनीला एकरी भाव आणि त्याचसोबत साडेबारा टक्के विकसित भूखंड आणि तोही त्याच भागात देणे बंधनकारक झाले.

जासईच्या ज्या आंदोलनाने 'दिबां'ना प्रकल्पग्रस्तांचा नेता बनवले. जासई गावातील 'दिबां'च्या संग्राम नावाच्या छोट्याशा घरात आजही बलिदान दिलेल्या पाच शेतकऱ्यांचे फोटो लावलेले आहेत. लोकांनी 'दिबां'ना दैवत मानले, मात्र 'दिबां'नी या पाच हुतात्म्यांना दैवत मानले, असे त्यांचे पुत्र अतुल पाटील सांगतात. केवळ जनतेच्या पाठिंब्यावर महाराष्ट्र सरकारला नमते घ्यायला लावणारा हा नेता कोण होता, तर शेतकरी कुटुंबातला मुलगा. १३ जानेवारी १९२६ रोजी जन्म झालेल्या 'दिबां'नी स्वातंत्र्य संग्रामातही सहभाग नोंदवला होता. तरुण असताना ते १९४२च्या चळवळीत सहभागी झाले होते.

लोकनेते दि.बा. पाटील हे शिक्षणाबाबत जागृत कुटुंबात वाढल्याने त्यांचे वकिलीपर्यंत शिक्षण झाले. बीए मुंबईतून, तर पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयातून एलएलबीचे शिक्षण घेतले. प्रकल्पग्रस्तांचे नेते म्हणून ते पुढे नावारूपाला आले, मात्र त्यापूर्वीही त्यांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदान दिले आहे.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन म्हणतात, दि.बा. पाटील यांना केवळ प्रकल्पग्रस्तांचे नेते म्हणून पाहू नका, त्यांनी महाराष्ट्रातल्या धरणग्रस्तांसाठी केलेल्या कामाचाही उल्लेख व्हायला हवा. त्यांनी आदिवासी, शेतकरी, स्त्रियांचेही प्रश्न सभागृहात मांडले. ते लोकांच्या प्रश्नांवर बेधडकपणे आवाज उठवण्यासाठी ओळखले जात. १९५१ साली वकिली पूर्ण झाल्यानंतर १९५२ साली ते कुलाबा (आताचा रायगड) जिल्हा लोकल बोर्डाच्या निवडणुकीत बहुमताने विजयी झाले होते. या निवडणुकीद्वारेच त्यांनी राजकारणात खऱ्या अर्थी प्रवेश केला होता, मात्र याच काळात संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनासाठी बांधणी सुरू झाली होती. आपला वकिली व्यवसाय सांभाळत लोकप्रतिनिधी म्हणून ते उत्तम प्रकारे काम करीत होते, मात्र १९५६मध्ये 'दिबां'नी संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीप्रश्नी लोकल बोर्डाचा राजीनामा दिल्याची माहिती भाजपचे पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर देतात. त्यानंतर १९५७ साली 'दिबां'नी पहिल्यांदा विधानसभा निवडणूक लढवली. ते पनवेलमधून उमेदवार होते आणि ते विजयीही झाले.

दि.बा. पाटील हे पनवेल पालिकेचे नगराध्यक्ष, महाराष्ट्राचे पनवेल–उरण विधानसभा मतदारसंघाचे चार वेळा आमदार, महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते आणि रायगडचे दोन वेळा खासदार होते. सिडको (सिटी इंडस्ट्रियल डेव्हलपमेन्ट कॉर्पोरेशन) ही सरकारी संस्था त्या वेळी नवी मुंबईची बांधणी करीत होती. त्या काळात दि.बा. पाटील यांनी नवी मुंबई सिडको आणि जेएनपीटी (न्हावा शेवा बंदर) प्रकल्पग्रस्त जनतेचे खंबीर नेतृत्व केले. शेतकरी–कष्टकऱ्यांसाठी सारे आयुष्य झिजवले. पोलिसांचा लाठीमार सहन केला तसेच कारावासही पत्करला. साधी राहणी, उच्च विचारसरणी असणाऱ्या या नेत्याच्या एका हाकेला हजारो, लाखोंच्या संख्येने ओ देणारे कार्यकर्ते होते.

'कष्टकऱ्यांचा योद्धा' पुस्तकात दि.बां. पाटील यांच्या संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातील योगदानाबद्दल विस्तृत माहिती सापडते. १९५७च्या सुमारास ज्या वेळी बेळगावच्या सीमेवर जाऊन महाराष्ट्रासाठी आंदोलन करण्याचे ठरले, त्या वेळी पनवेल, अलिबाग भागातून दि.बा. पाटील आणि दत्ता पाटील यांच्यावर आंदोलक आणण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. सीमेवर हे नेते पोहचल्यावर त्यांना दोनवेळा अटक झाली. मग सोडून देण्यात आले. तेव्हा दि.बा. पाटील आणि दत्ता पाटील परतत असताना निपाणीजवळ सत्याग्रह सुरू असल्याचे दिसले, तर त्यांनी त्यात सहभाग घेतला. या वेळी मात्र 'दिबा' आणि दत्ता पाटलांना पोलिसांनी सोडले नाही. त्यांना एका वर्षांचा तुरुंगवास ठोठावला, पण त्यांनी संयुक्त महाराष्ट्रासाठी ही शिक्षाही भोगली. पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतरही १९६२, १९६७, १९७२ आणि १९८० अशा वेळी आमदार म्हणून विधानसभेत गेले. पुढेही सीमाभागातील मराठीजनांवरील अन्यायाविरोधात प्रा.एन.डी. पाटलांच्या खांद्याला खांदा लावून दि. बा. पाटील यांनी विधानसभेत आवाज उठवला. १९८३–८४ दरम्यान ते महाराष्ट्राच्या विधानसभेत विरोधी पक्षनेतेही होते.

२४ जून २०१३ रोजी हृदयविकाराने 'दिबां'चे निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. त्यांच्यामागे दोन मुले, दोन मुली, स्नुषा, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. पनवेल येथील अमरधाम स्मशानभूमीत त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. मागील काही वर्षांपासून 'दिबां'ना श्वसनाचा तसेच छातीतील कफाचा त्रास होत होता. त्यामुळे त्यांच्यावर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू होते. येथेच उपचारादरम्यान त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला व त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांचा मृतदेह आधी त्यांच्या पनवेल येथील (संग्राम) घरी नेण्यात आलेला. रायगडमधील सर्वपक्षीय नेत्यांनाही 'दिबां'च्या अंत्यदर्शनासाठी उपस्थित लावली होती. त्यानंतर त्यांचे पार्थिव उरण–पनवेल आगरी समाजाच्या महात्मा फुले सभागृहात अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. त्यांच्या अंत्यदर्शनासाठी जनसमुदाय लोटला होता. या अंत्ययात्रेत हजारोच्या संख्येने 'दिबा' समर्थक आणि स्थानिक सहभागी झाले होते. अशा या महान नेत्याला स्मृतिदिनी विनम्र अभिवादन.

(साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

### ॲमेझॉनच्या आयफोन एअरवर तगडे डिस्काऊंट

ॲपलच्या आगामी आयफोन एअर २ संदर्भातील चर्चा जोरात सुरू असतानाच सध्या बाजारात उपलब्ध असलेला आयफोन एअर अगदी स्वस्तात खरेदी करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. ॲमेझॉनवर आयफोन एअरच्या खरेदीवर २२ हजारांपेक्षा जास्त डिस्काऊंट मिळत आहे. शिवाय, निवडक बँकच्या क्रेडिट कार्डधारकांना अतिरिक्त सूट दिली जात आहे. प्रीमियम स्मार्टफोन खरेदी करण्याचा विचार करणाऱ्यांसाठी ही एक उत्तम संधी मानली जात आहे.



भारतात आयफोन एअर एक लाख १९ हजार ९०० रुपयांत लॉन्च करण्यात आला, मात्र ॲमेझॉनवर हा फोन सध्या ९६ हजार ९९० रुपयांत विक्रीसाठी उपलब्ध आहे. म्हणजेच ग्राहकांना थेट २२ हजार ९१० रुपयांची सवलत मिळत आहे. याशिवाय, एसबीआय, एक्सिस आणि आयसीआयसी बँकच्या क्रेडिट कार्डद्वारे पेमेंट केल्यास ग्राहकांना चार हजार रुपयांपर्यंत अतिरिक्त डिस्काउंट मिळू शकतो. त्यामुळे फोनची किंमत ९२ हजार ९९० रुपयांपर्यंत कमी होऊ शकते.

एक्स्चेंज ऑफर आणि ईएमआयचा पर्याय

ॲमेझॉन या फोनवर ग्राहकांना ईएमआयचा पर्यायही देत आहे. ग्राहक दरमहा तीन हजार ४१० रुपये ईएमआयचा पर्याय निवडू शकतात तसेच जुना स्मार्टफोन एक्सचेंज केल्यास ३९ हजार ५० रुपयांपर्यंत एक्स्चेंज बोनस मिळू शकतो, मात्र एक्स्चेंजची जुन्या फोनचा ब्रँड, मॉडेल आणि स्थिती यावर अवलंबून असेल.

खरेदीसाठी योग्य वेळ?

हलका, स्टायलिश डिझाइन, फ्लॅगशिप दर्जाची कामगिरी आणि सध्या सुरू असलेल्या आकर्षक ऑफर्समुळे आयफोन एअर खरेदी करण्यासाठी हा योग्य काळ मानला जात आहे. ज्यांना ॲपल इकोसिस्टमचा अनुभव घ्यायचा आहे, त्यांच्यासाठी ही डील फायदेशीर ठरू शकते.

ॲमेझॉन सुरू असलेल्या सेलमध्ये ग्राहक आयफोनसह अँड्रॉईड स्मार्टफोन सॅमसंग गॅलेक्सी एस २५ प्लस, सॅमसंग गॅलेक्सी एस २५ अल्ट्रा आणि शाओमी १४ अल्ट्रा यांसारखे स्मार्टफोन स्वस्तात खरेदी करू शकतात.

# क्रांतिकारक दामोदर हरि चापेकर

हरिभाऊ चापेकर या एका कीर्तनकारांच्या घरी २५ जून १८६९ रोजी दामोदर चाफेकर यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच टिळकांच्या विचारांचा प्रभाव दामोदर यांच्यावर होता. लहानपणापासूनच दामोदर चापेकर यांना व्यायामाची आवड होती. समवयस्क मित्रांना संघटित करून त्यांनी एक व्यायामशाळा सुरू केली. इंग्रजांकडून करण्यात येणार्या अत्याचाराची दामोदरपंतांना मनस्वी चीड होती. दामोदरपंतांचे लहान भाऊ बाळकृष्ण हरि चापेकर व वासुदेव हरि चापेकर दोघेही त्यांच्या प्रत्येक कार्यात सहभागी होत होते.



या तिन्ही भावांना चापेकर बंधू नावाने ओळखले जाते. हे तिन्ही भाऊ लोकमान्य टिळक यांच्या संपर्कात होते. टिळकांना ते गुरू मानत असत. त्यांचे वडील हरिपंत हे पुणे व मुंबई येथे हरिकथा सांगायचे. बालवयात तिघेही भाऊ हरि कीर्तनात वडिलांना मदत करायचे. त्यामुळे चापेकर बंधूंच्या शिक्षणात खंड पडला. विठ्ठलभक्ती करणार्या या मराठी कुटुंबाने देशासाठी प्राण अर्पण करणारे ३ तरणीबांड मुलेही दिली.

पुण्यामध्ये १८९७मध्ये प्लेगची साथ आली. प्लेगपीडित रुग्णांना शोधून उपचार करण्याच्या नावावर इंग्रजांनी पुण्यातील घराघरात शोध मोहीम उघडली आणि अत्याचाराचा कहर केला. यामुळे इंग्रजांविरोधात असंतोष पसरू लागला. तत्कालीन जिल्हाधिकारी वाल्टर चार्ल्स रँड हा अत्यंत क्रूर, खुनशी होता. पुण्याच्या नागरिकांवर अत्याचार करण्यात तो सर्वात पुढे होता. बाळ गंगाधर टिळक आणि आगरकर यांनी या अत्याचाराविरोधात टीका केली. यामुळे त्यांना जेलमध्ये टाकण्यात आले. दरम्यान, दामोदरपंतांनी रँडची हत्या करण्याची योजना आखली. २२ जून १८९७ रोजी पुण्यातील गणेशखिंडीत रँड आणि त्याचा सहकारी लेफ्लनंट आयस्टर यांची एका कार्यक्रमाहून परतत असताना गोळ्या झाडून हत्या केली.

गणेश आणि रामचंद्र या द्रविड बंधूंनी केलेल्या गद्दारीमुळे इंग्रजांना हल्लेखोरांची नावे कळाली आणि त्यांनी दमोदरपंतांना अटक केली. त्यानंतर काही दिवसातच बाळकृष्ण व वासुदेव चापेकर, तसेच महादेव रानडे या सर्वांनाच पकडण्यात आले. इंग्रजांनी दामोदरपंतांना १८ एप्रिल १८९८ रोजी पुण्यातील येरवडा तुरुंगात फाशी दिली. त्यानंतर वासुदेव चापेकरांना ८ मे १८९९ रोजी तर बाळकृष्ण चापेकरांना आणि महादेव रानड्यांना १० मे १८९९ रोजी फाशी देण्यात आली.

येरवडा तुरुंगात असताना त्यांनी आपला जीवन प्रवास आणि क्रांतीकार्याचे तपशील नमूद करणारे १०० पानी आत्मवृत्त मोडीत लिहून काढले. ते वि.गो.खोबरेकर यांनी संपादित करून मराठीत आणले. १९७४ साली ते राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई या संस्थेने प्रकाशित केले. मुळात हे आत्मवृत्त म्हणजे खून करण्यास चापेकर का व कसे प्रवृत्त झाले याची हकीकत लिहिण्यास त्यांना सांगण्यात आले व येरवाडा जेलमध्ये असताना त्यांनी ८ ऑक्टोबर १८९७ रोजी ते पूर्ण केले. हे आत्मवृत्त एकूण मराठी साहित्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. एकतर एका निधड्या छातीच्या क्रांतिकारकाचे मोकळे ढाकळे आत्मवृत्त आहे. आपण क्रांतिकारक कसे होत गेलो, त्याचे क्रमवार वर्णन चापेकरांनी त्यात केले आहे. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



# आरोग्य प्रहर

## हिमोग्लोबिनच्या कमतरतेमुळे शरीरात होतात 'हे' परिणाम

आपल्या शरीरात काही पोषक तत्व कमी होतात, तेव्हा त्याची बरीचशी लक्षणं शरीरात दिसू लागतात. वेगवेगळ्या समस्या होऊ लागतात. आयर्न शरीरातील महत्वाच्या मिनरलपैकी एक आहे. हिमोग्लोबिन तयार करण्यात मदत करतं. हिमोग्लोबिन रेड ब्लड सेल्समध्ये असलेलं असं प्रोटीन आहे, जे शरीराच्या वेगवेगळ्या अवयवांपर्यंत ऑक्सिजन पोहचवण्याचं काम करतं. जेव्हा शरीरात आयर्न कमी होतं. तेव्हा पुरेसं हिमोग्लोबिन तयार होत नाही आणि ॲनिमियाचा धोका वाढतो.



आयर्न कमी झाल्याचं सगळ्यात मोठं लक्षण हे थकवा जाणवणं असतं. जेव्हा शरीरातील अवयवांपर्यंत पुरेसा ऑक्सिजन पोहचत नाही, तेव्हा एनर्जी लेव्हल कमी होऊ शकते. जर पुरेसा आराम करूनही कमजोरी, सुस्ती किंवा थकवा जाणवत असेल तर आयर्न कमी झालेलं असू शकतं.

हिमोग्लोबिन कमी झाल्याचा प्रभाव त्वचेवरही दिसू लागतो. आयर्न कमी झाल्यावर चेहरा सामान्यापेक्षा जास्त पिवळा दिसू लागतो. काही लोकांमध्ये ओठ, हिरड्या आणि डोळ्यातही पिवळेपणा दिसतो. या लक्षणांकडे अजिबात दुर्लक्ष करू नये. वेळीच डॉक्टरांना संपर्क करावा.

हलकं काम करतानासुद्धा श्वास भरून येतो. पायऱ्या चढताना किंवा थोडं चालल्यावरही थकवा जाणवतो. त्याशिवाय काही लोकांना चक्कर येणे किंवा डोकं हलकं होण्यासारख्या समस्याही जाणवू शकतात.

आयर्न कमी झाल्याचा प्रभाव केसांवर आणि नखांवरही दिसून येतो. अनेक महिलांचे केस जास्त प्रमाणात गळतात किंवा केस पातळ होतात. नखं कमजोर होतात आणि सहजपणे तुटतात. काही केसेसमध्ये नखांचा आकार बदलू शकतो. हा आयर्नच्या कमतरतेचा संकेत असू शकतो.

आयर्न कमी झाल्यावर मेंदूपर्यंत पुरेसा ऑक्सिजन पोहचत नाही, ज्यामुळे डोकेदुखीचा त्रास वाढतो. काही लोकांना फोकस करण्यास अडचणे येते किंवा मानसिक थकवा जाणवतो. जर आपल्याला पुन्हा पुन्हा हे संकेत दिसत असतील तर शरीरात आयर्न कमी झालेलं असू शकतं.

महिलांमध्ये आयर्नची कमतरता पुरूषांच्या तुलनेत जास्त बघायला मिळते. मासिक पाळी, गर्भावस्था, स्तनपान आणि पोषणासंबंधी कारणं याची मुख्य कारणं असू शकतात. जर वेळीच आयर्न कमी झाल्याची लक्षणं ओळखली, तर होणाऱ्या समस्या सहज टाळता येतात.

नमुना – १

## खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत

## जाहीर नोटीस

क्र. उजि (भू) राउ/कार्या-१/थेटखरेदी/
मौ- सायडोंगर/एसआर-१६३८/२०२६
उपजिल्हाधिकारी भूसंपादन रायगड
(०) अलिबाग यांचे कार्यालय
दि : २२/०६/२०२६

ज्या अर्थी, कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड यांनी कर्जत तालुक्यातील मौजे सायडोंगर येथील अनुसूची १ मध्ये समाविष्ट जमिनी या मे टोरंट पावर कंपनीच्या प्रस्तावित सायडोंगर -१ कर्जत (३००० MW) उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी पर्यायी रस्ता म्हणून राजनाला कालवा व पाली पोटल कालवा याचे दरम्यान **मिसिंग लिंक रस्त्यासाठी प्रस्ताव** या सार्वजनिक प्रयोजनाकरीता महसुल व वन विभागाकडील शासन निर्णय, क्रं. संकिर्ण ०३/२०१५/प्र.क्र. ३४/अ-२, दि. १२/०५/२०१५ व दि. ३०/०९/२०१५ व शासन परिपत्रक क्रं. एलक्यूएन-०१/२०१७ प्र.क्र. १२/अ-२ दि. २५/०१/२०१७ मधील तरतुदीस अनुसरून खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने **कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड** यांचे नावे घेण्याबाबत प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी रायगड यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्या अर्थी, मा. जिल्हाधिकारी रायगड यांचे आदेश क्रमांक क्र.भूस/टे-६/उदंचन जलविद्युत प्रकल्प Approach Road-Missing Link/२०२६ दि. १५/०६/२०२६ अन्वये उक्त प्रस्तावासंबधी उक्त शासन निर्णय दिनांक १२/०५/२०१५ व दि. ३०/०९/२०१५ आणि तनुषंगिक शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एलक्यूएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२/दिनांक २५/०१/२०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्या अर्थी आता,

१. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदींनुसार, मी श्री. श्रीकांत गायकवाड उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) रायगड (०) अलिबाग यादवारे,

एक) अनूसूची-एक मध्ये नमुद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने **कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड** यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे, आणि

दोन) प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समिती मार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेडयुल १ च्या तरतुदीनुसार संबंधित जमीनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर २५% रक्कम वाढीव देऊन, मोबदला निश्चित करण्यात येईल.

तीन) संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन वाटाघाटीद्वारे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चीत केलेला मोबदला संपूर्णतः अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्र (विकल्प) मागवित आहे.

**सही/-**
**(श्रीकांत गायकवाड)**
**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)**
**रायगड (०) अलिबाग**

**अनुसूची-१**
**खरेदी द्यावयाच्या जमीनीचा तपशिल**
**गांव : सायडोंगर, तालुकाः कर्जत, जिल्हाः रायगड**

| अ.क्र. | भूमापन क्रमांक/ गट क्रमांक | जमीनीचा प्रकार | जमीनीचा वर्ग | भूधारकाचे नाव | संपादनाचे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | २२/२ पै | जिरायत | १ | छबुबाई यशवंत अधिकारी<br>सुभद्रा जगनाथ यशवंतराव<br>चंपाबाई माधवराव देशमुख<br>शकुंतला रामचंद्र देशमुख<br>शिंदु रामचंद्र देशमुख<br>जयवंत रामचंद्र देशमुख<br>सुनिल रामचंद्र देशमुख<br>संदिप रामचंद्र देशमुख<br>शशिकला भगवान यशवंतराव<br>उषा रविंद्र अधिकारी<br>आशा रविंद्र यशवंतराव<br>मनिषा विनोद हिंदुराव<br>भिमाबाई काशिनाथ देशमुख<br>सोपान काशिनाथ देशमुख<br>गणपत काशिनाथ देशमुख<br>जयश्री रमाकांत गंभीरराव<br>सुलोचना तानाजी यशवंतराव<br>सुनंदा वसंत देशमुख<br>रविंद्र वसंत देशमुख<br>प्रकाश वसंत देशमुख<br>उमेश वसंत देशमुख<br>वर्षा विलास झुंजारराव<br>संगिता विजय आलम | ०.१४.०० |
| २ | २३/१ पै | जिरायत | १ | रविश चंद्रशेखर मुसळे<br>प्रियांका रविश मुसळे | ०.०१.९० |
| | २३/२ पै | जिरायत | १ | रघुनाथ जगु कराळे<br>कल्पेश सुरेश सोनावळे<br>ज्योती सचिन थोरात | |
| ३ | २४ पै | जिरायत | १ | छबुबाई यशवंत अधिकारी<br>सुभद्रा जगनाथ यशवंतराव<br>चंपाबाई माधवराव देशमुख<br>शकुंतला रामचंद्र देशमुख<br>शिंदु रामचंद्र देशमुख<br>जयवंत रामचंद्र देशमुख<br>सुनिल रामचंद्र देशमुख<br>संदिप रामचंद्र देशमुख<br>शशिकला भगवान यशवंतराव<br>उषा रविंद्र अधिकारी<br>आशा रविंद्र यशवंतराव<br>मनिषा विनोद हिंदुराव<br>भिमाबाई काशिनाथ देशमुख<br>सोपान काशिनाथ देशमुख<br>गणपत काशिनाथ देशमुख<br>जयश्री रमाकांत गंभीरराव<br>सुलोचना तानाजी यशवंतराव<br>सुनंदा वसंत देशमुख<br>रविंद्र वसंत देशमुख<br>प्रकाश वसंत देशमुख<br>उमेश वसंत देशमुख<br>वर्षा विलास झुंजारराव<br>संगिता विजय आलम | ०.०८.३० |
| ४ | ३०/२ पै | जिरायत | १ | विक्रम प्रकाशचंद्र पाटील<br>स्मिता सुरेश गीध | ०.६९.५० |
| | ३०/३ पै | जिरायत | १ | शंतनू सुनील परदेशी<br>विलास विष्णू देशमुख | |
| | ३०/४/अ/१/अ पै | जिरायत | १ | गणेश बच्चा पुजारी<br>प्रमिला गणेश पुजारी | |
| | ३०/४/अ/१/ब पै | जिरायत | १ | केरू गणपत देशमुख | |
| | ३०/४/अ/२ पै | जिरायत | १ | विष्णू रावजीराव देशमुख | |
| | ३०/४/ब पै | जिरायत | १ | विलास विष्णू देशमुख | |
| | ३०/५ पै | जिरायत | १ | विष्णू रावजीराव देशमुख | |
| | ३०/९/अ १ पै | जिरायत | १ | विलास विष्णू देशमुख | |
| | ३०/९/अ २ पै | जिरायत | १ | विलास विष्णू देशमुख | |
| | ३०/९/ब पै | जिरायत | १ | संजय पारसमल बाकलिवाल | |
| | ३०/१० पै | जिरायत | १ | इस्माईल सय्यद मालदार | |
| | ३०/११ पै | जिरायत | १ | उदय मुरलिधर कोळवणकर | |
| | ३०/१२/अ पै | जिरायत | १ | इस्माईल सय्यद मालदार<br>तन्वी शरद जाधव<br>लक्ष्मी शरद जाधव<br>दिप्ती दत्तात्रय नार्वेकर | |
| | ३०/१२/ब पै | जिरायत | १ | हारप्रितींग मखनसिंग अवदील | |
| | ३०/१३ पै | जिरायत | १ | इस्माईल सय्यद मालदार | |
| | ३०/१५ पै | जिरायत | १ | विलास विष्णू देशमुख | |
| ५ | ३१/१ पै | जिरायत | १ | मेघाली रोहिदास भगत | ०.००.३० |
| | ३२/२ पै | जिरायत | १ | मेघाली रोहिदास भगत | |
| ६ | ३२/२ पै | जिरायत | १ | विशाल महादेव केदार<br>निखिल संजय पवार<br>किशोर शिवनाथ हडप | ०.१८.८० |
| | ३२/५ पै | जिरायत | १ | रिनेश सुरेश सोनावळे<br>जान्हवी जयदिप मिसाळ | |
| ७ | ३३/१/अ/१/ पै | जिरायत | २ | काळुराम शंकर खंडागळे<br>आप्पा शंकर खंडागळे<br>गणपत शंकर खंडागळे<br>सुशिला चंदर खंडागळे<br>शैला अनंत वाघमारे<br>यशवंत चंदर खंडागळे<br>राजेंद्र चंदर खंडागळे<br>वसंत चंदर खंडागळे | ०.२८.०० |
| | ३३/१/अ/२/ पै | जिरायत | १ | उदय मुरलिधर कोळवणकर<br>विभुती आदित्य तावडे | |
| | ३३/१/ब पै | जिरायत | १ | विभुती आदित्य तावडे<br>भगवान भालचंद्र वैद्य | |
| | ३३/५ | जिरायत | १ | सुबोध बाळकृष्ण सावंत<br>भगवान भालचंद्र वैद्य | |
| ८ | ३६/४/अ/१ पै | जिरायत | १ | हिराबाई द्वारकानाथ देशमुख<br>चंद्रकांत द्वारकानाथ देशमुख<br>प्रफुल्ल द्वारकानाथ देशमुख<br>प्रकाश महादेव चौधरी<br>पद्माकर महादेव चौधरी<br>विमल मधुकर घारे<br>जयश्री जयसिंग चौधरी<br>भुषण जयसिंग चौधरी<br>नम्रता जयसिंग चौधरी<br>प्रियंका जयसिंग चौधरी<br>कोमल जयसिंग चौधरी<br>आनंद जयसिंग चौधरी<br>वसंत कोंडू देशमुख<br>सुनंदा विठ्ठल गुरव | ०.१६.०० |
| | ३६/४/अ/२ पै | जिरायत | १ | इरफान खान | |
| | ३६/४/ब पै | जिरायत | १ | आनंद भालचंद्र मांजरेकर | |
| | ३६/५ पै | जिरायत | १ | नथु रामचंद्र देशमुख | |

**सही/-**
**(श्रीकांत गायकवाड)**
**ठिकाण : अलिबाग**
**तारीख : २२/०६/२०२६**
**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) रायगड (०) अलिबाग**

( पान ७ वर )..

# मोरबे धरण क्षेत्रात दमदार पाऊस

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सोमवारी रात्रीपासून सुरू झालेल्या सरींमुळे उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला असून नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणातील जलसाठाही २६.४० टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे पाणीसाठ्याबाबत निर्माण झालेली चिंता काही प्रमाणात कमी झाली आहे.

मान्सूनचे आगमन अपेक्षेपेक्षा उशिरा होत असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. दिवसेंदिवस वाढणारा उकाडा आणि दमट हवामान यामुळे दैनंदिन जीवनावर परिणाम होत होता. विशेषतः सकाळपासूनच जाणवणारी उष्णता आणि रात्रीपर्यंत टिकणारी आर्द्रता यामुळे नागरिक हैराण झाले होते. मंगळवारी सकाळी शहराच्या विविध भागांत झालेल्या पावसामुळे तापमानात काहीशी घट झाली असून वातावरण सुखावले आहे.

पावसाच्या आगमनाकडे केवळ नागरिकच नव्हे तर प्रशासनाचेही लक्ष लागले होते. नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरण क्षेत्रात समाधानकारक पाऊस होणे आवश्यक असल्याने धरण



परिसरात पावसाची विशेष प्रतीक्षा होती. अवघ्या आठवडाभरापूर्वी मोरबे धरणातील जलसाठा १२.७३ टक्क्यांपर्यंत घसरला होता. त्यामुळे संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने विविध उपाययोजनांची तयारीही सुरू केली होती. त्यानंतर झालेल्या पावसामुळे जलसाठा २६.४० टक्क्यांवर पोहोचला असला तरी तो अद्याप समाधानकारक पातळीवर नसल्याने आगामी काळातील पावसाकडे प्रशासनाचे लक्ष लागले आहे.

महापालिकेच्या नोंदीनुसार, २२ जून रोजी सकाळी ८.३० ते २३ जून रोजी सकाळी ८.३० या २४ तासांच्या कालावधीत शहरात सरासरी ५.०८ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. या कालावधीत बेलापूर येथे ९.१० मिलिमीटर, कोपरखैरणे येथे ८.४० मिलिमीटर आणि नेरुळ येथे ६.६० मिलिमीटर पाऊस झाला. तर वाशी, ऐरोली आणि दिघा परिसरात तुलनेने कमी पर्जन्यमानाची नोंद झाली. १ जूनपासून आतापर्यंत शहरात एकूण ९.८५ मिलिमीटर पाऊस झाला आहे.दरम्यान, पावसाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने परिस्थितीवर लक्ष ठेवले आहे. गेल्या २४ तासांत शहरात झाड पडण्याची एक घटना घडली असून अग्निशमन विभागाला तीन आपत्कालीन कॉल प्राप्त झाले. मात्र, कोणतीही मोठी दुर्घटना घडलेली नसल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

### जलसाठ्यात होतेय वाढ; नवी मुंबईकरांना दिलासा!

नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरण परिसरात गेल्या २४ तासांत १९.२० मिलिमीटर पावसाची नोंद झाली. १ जूनपासून आतापर्यंत धरण क्षेत्रात एकूण २५.२० मिलिमीटर पर्जन्यमान झाले आहे. सध्या धरणाची पातळी ६९.४८ मीटर असून जलसाठा १२.७३ टयांवरून २६.४० टयांवर पोहोचला आहे. मान्सूनच्या उशिरामुळे धरणातील पाणीसाठ्याबाबत चिंता व्यक्त केली जात होती. त्यामुळे धरण क्षेत्रात होणाऱ्या प्रत्येक पावसाकडे प्रशासन आणि नागरिकांचे लक्ष लागले असून आगामी काळात पावसाचा जोर वाढल्यास जलसाठ्यात लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा आहे.

# प्रकल्पग्रस्तांच्या सुनावणी नोटिसांप्रकरणी आमदार मंदाताई म्हात्रे यांची लक्षवेधी

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील स्थानिक प्रकल्पग्रस्त (भूमिपुत्र) नागरिकांच्या घरांना व इमारतींना महापालिका प्रशासनाकडून बजावण्यात येत असलेल्या सुनावणीच्या नोटिसांमुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष, संभ्रम आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या गंभीर व ज्वलंत प्रश्नाकडे राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी बेलापूर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे लक्षवेधी सूचना मांडून या नोटिसांना तत्काळ स्थगिती देण्याची मागणी केली.

आमदार मंदा म्हात्रे यांनी या विषयाचे गांभीर्य सभागृहासमोर मांडताना सांगितले की, नवी मुंबईतील सर्व गावठाण भागांमध्ये महापालिकेतर्फे या सुनावणीच्या नोटिसा दिल्या जात आहेत, तेथील अनेक घरे ही आजची नसून तब्बल ७० ते ८० वर्षांपूर्वीची जुनी व पारंपरिक आहेत. विशेष म्हणजे, शासनाने यापूर्वीच या घरांना अधिकृत मालमत्तापत्रके यूदेखील बहाल केली असून असे असतानाही, ज्या भूमिपुत्रांनी त्याग करून नवी मुंबई शहराच्या निर्मितीसाठी आपल्या हक्काच्या जमिनी दिल्या, आज त्यांनाच प्रशासकीय चक्रव्यूहात अडकवून मानसिक त्रास दिला जात आहे.

या अत्यंत संवेदनशील आणि जिव्हाळ्याच्या



विषयावर राज्य सरकारने तात्काळ हस्तक्षेप करावा, अशी मागणी आमदार म्हात्रे यांनी केली. तसेच, जोपर्यंत शासन स्तरावर या संपूर्ण प्रकरणावर सविस्तर चर्चा होऊन एखादा ठोस व कायमस्वरूपी सकारात्मक मार्ग निघत नाही, तोपर्यंत महानगरपालिकेने सुरू केलेली ही सुनावणीची प्रक्रिया संपूर्णपणे थांबवून तात्काळ स्थगिती देण्यात यावी.

भूमिपुत्रांच्या हक्कासाठी आणि त्यांच्या हक्काच्या छतासाठी आमदार मंदा म्हात्रे या सुरुवातीपासूनच खंबीरपणे लढत आल्या असून, याही प्रकरणात त्या शेवटपर्यंत प्रकल्पग्रस्तांच्या पाठीशी राहून त्यांना न्याय मिळवून देतील, असा विश्वास नवी मुंबईकरांमध्ये निर्माण झाला आहे.

# कचरा वर्गीकरणाबाबत विशेष व्यापक जनजागृती मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ च्या अनुषंगाने दि. १५ ते ३० जून २०२६ या कालावधीत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व रेल्वे स्टेशन, सायन पनवेल हायवे, झोपटपट्टी भाग, गाव/गावठाण क्षेत्र, तलाव व खाडी किनारे, सार्वजनिक व सामुदायिक शौचालये, स्वच्छता लक्ष्य युनिट अशी दुर्लक्षित क्षेत्रे, बॅक लेन अर्थात घरांच्या किंवा इमारतींच्या मागील बाजूस असलेल्या अरूंद गल्ल्या इ. ठिकाणी व्यापक स्वरूपात विशेष स्वच्छता मोहिमा राबविण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

त्याचसोबत घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ च्या प्रभावी अंमलबजावणीकरिता घरापासूनच चार प्रकारे कचरा वर्गीकरण करणे तसेच मोठ्या सोसायट्या, संस्था यांनी आपल्या आवारातच दररोज निर्माण होणा-या कच-याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट करणे याबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ८ विभाग कार्यालय क्षेत्रात एजी एन्व्हायरो व परिसर सखी या संस्थांच्या माध्यमातून सोसायट्या आणि संस्था, वाणिज्य संस्था तसेच घरोघरी जाऊन जनजागृती करण्यात येत आहे. यामध्ये घरगुती स्तरावर ओला, सुका, घरगुती घातक आणि





सॅनिटरी कचरा अशा ४ प्रकारे कचरा वर्गीकरण करणेबाबत तसेच हा वर्गीकृत कचरा कचरा वाहतूक करणा-या वाहनांमध्ये वेगवेगळा देणेबाबत माहिती देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणा-या सोसायट्या, संस्था यांनी आपल्या आवारात कच-याची आपल्यामार्फतच विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने स्वतःच असा प्रकल्प उभारावयाचा आहे याविषयी सूचित करण्यात येत आहे.

त्यास अनुसरून राबविण्यात येणा-या विशेष स्वच्छता मोहीमांच्या अनुषंगाने परिमंडळ १ क्षेत्रात सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांची विशेष स्वच्छता मोहीम घेण्यात आली. यामध्ये बाळाराम पाटील सार्वजनिक शौचालय, सेक्टर-५, सानपाडा तसेच सुनिल गावस्कर मैदान, सेक्टर २, सीबीडी बेलापूर येथील सार्वजनिक शौचालय आणि आग्रोळी येथील आयटीआय जवळील सार्वजनिक शौचालय त्याचप्रमाणे निसर्ग उद्यान कोपरखैरणे जवळील शौचालय व सेंट मेरी उद्यान सार्वजनिक शौचालय अशा विविध विभागांतील शौचालयांची अंतर्गत व बाह्य परिसराची सखोल स्वच्छता करण्यात आली आणि नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली.

परिमंडळ २ क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणा-या सोसायट्या व संस्थाना (BWG) प्रत्यक्ष भेटी देऊन जनजागृती करण्यात आली. यामध्ये गवते वाडी, माईंड स्पेस, चिंचपाडा ऐरोली, ग्रीन वर्ल्ड सोसायटी दिघा अशा विविध ठिकाणी पाहणी करण्यात आली आणि सोसायटी व कंपनी मधील संबंधित अधिकारी आणि ऑपरेटर यांना मार्गदर्शन करण्यात आले. सदर खत प्रकल्प कार्यान्वित ठेवण्यच्या अनुषंगाने यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.

सर्वच विभाग कार्यालय क्षेत्रात महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे यांच्या माध्यमातून विशेष स्वच्छता मोहीमा राबविण्यात येत आहेत.

# तुर्भे स्टेशनजवळील पदपथांची दुरवस्था



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

तुर्भे रेल्वेस्थानकाजवळील पदपथांची दुरवस्था झाली आहे. महापालिका प्रशासनाकडून होत असलेल्या दुर्लक्षाविषयी प्रवाशांनी संताप व्यक्त केला आहे.

पनवेल-ठाणे लोहमार्गावर तुर्भे रेल्वेस्थानक आहे. या रेल्वेस्थानकातून हजारो प्रवासी एपीएमसी मार्केट मध्ये कामासाठी ये-जा करत असतात. पश्चिमेकडील बाजूला एपीएमसी मार्केट तर पूर्वेला औद्योगिक वसाहत आहे. पश्चिमेकडील रेल्वे स्थानकाच्या बाहेरील जनता मार्केटकडे जाणारे पदपथ तसेच मार्केटकडे रहिवासी वस्ती लगत असलेले पदपथ हे ठीक ठिकाणी खराब झाले आहे. अनेक ठिकाणी परिपथावरील लाद्या उखडून गेल्याने पादचाऱ्यांना अडथळा युक्त प्रवास करावा लागत आहे. काही ठिकाणी लाद्यांना धार असल्याने प्रवाशांना गंभीर ठेच लागून रक्त भांभळ होत असल्याच्या घटना घडत आहेत.

रेल्वेस्थानकहून तुर्भेकडे जाताना याच पदपथावर काही ठिकाणी अनधिकृत फेरीवाल्यांनी ताबा मिळवला आहे. त्यामुळे नागरिकांना जीव मुठीत धरून रस्त्यावरून प्रवास करावा लागत आहे. त्याचबरोबर तुर्भे स्थानक ते एपीएमसीकडे जाताना पदापदावर आणि रस्त्यामध्ये दोन्ही बाजूला फेरीवाले आणि अनधिकृत पार्किंग करून ठेवलेल्या गाड्या आहेत. यामुळे देखील रहिवाशांना प्रवाशांना रस्त्यावरून प्रवास करावा लागत आहे. या पदपथालगत दिवस रात्र अनधिकृत पार्किंग होत असल्याने गाड्यांच्या आडून काही लोक या ठिकाणी पदपथावर लघु शंका करत आहेत .



**उरण : भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या पुण्यतिथीनिमित्त मंगळवारी उरण भाजप संपर्क कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी भाजप राज्य परिषद सदस्य रवि भोईर, उत्तर रायगड जिल्हा कमिटी सदस्य सुनील पाटील, नगरसेवक जसीम गॅस, उरण शहर सरचिटणीस विशाल पाटेकर यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# नवी मुंबईत रंगणार महाराष्ट्र एमएसएमई परिषद २०२६

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित यांच्या वतीने जागतिक सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग दिनाचे औचित्य साधून येत्या दि. २७ जून २०२६ रोजी नवी मुंबईतील वाशी येथील सिडको प्रदर्शन केंद्रात "महाराष्ट्र एमएसएमई परिषद व एमएसएमई पुरस्कार २०२६" या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९.०० ते सायंकाळ ५.३० या वेळेत होणाऱ्या या परिषदेसाठी "संकल्पातून सिद्धीकडे ही संकल्पना (थिम) निश्चित करण्यात आली आहे. एक ट्रिलियन अमेरिकन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करणाऱ्या महाराष्ट्रात एमएसएमई क्षेत्राचे महत्त्व अधोरेखित करणे हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे.

या महत्त्वपूर्ण शिखर परिषदेमध्ये राज्यभरातील २ हजार ५०० हून अधिक एमएसएमई उद्योजक, धोरणकर्ते, गुंतवणूकदार, वित्तीय संस्था, उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ आणि आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. या परिषदेला विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

या कार्यक्रमादरम्यान उद्योग जगताशी संबंधित अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर सखोल विचारमंथन केले जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने निर्यातवृद्धी, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब, डिजिटल परिवर्तन, शाश्वत औद्योगिक विकास, वित्तपुरवठा तसेच महिला उद्योजकतेला चालना देणे यांसारख्या विषयांवर विशेष चर्चासत्रे आयोजित करण्यात आली आहेत.

या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे महाराष्ट्रातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या एमएसएमई उद्योगांचा गौरव करण्यासाठी 'महाराष्ट्र एमएसएमई पुरस्कार २०२६' चे वितरण केले जाणार आहे. राज्यातील उत्कृष्ट उद्योजकता, नवीन उपक्रम आणि उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाचा सन्मान करण्यासाठी हे पुरस्कार नऊ वेगवेगळ्या श्रेणींमध्ये प्रदान केले जातील. यामध्ये आर्टिसन/हॅंडिक्राफ्ट पुरस्कार, नेक्स्टजेन पुरस्कार, डिजिटल आणि एआय एक्सलन्स पुरस्कार, सर्व्हिस पुरस्कार, मॅन्युफॅक्चरिंग पुरस्कार, ग्रीन एंटरप्राइझ पुरस्कार, वुमन एंटरप्रेन्योर पुरस्कार आणि एक्सपोर्ट पुरस्कार यांचा समावेश आहे. तसेच 'चॅम्पियन एमएसएमई

पुरस्कार' ही यातील एक विशेष श्रेणी असेल. चॅम्पियन श्रेणी वगळता इतर प्रत्येक श्रेणीत 'एक्सलन्स' आणि 'अचीव्हर्स' अशा दोन उपश्रेणींमध्ये विजेत्यांची निवड करून राज्यातील नावीन्यपूर्ण, प्रगत आणि तंत्रज्ञानाभिमुख उद्योगांचा सन्मान केला जाणार आहे.

महाराष्ट्रातील सर्व एमएसएमई उद्योजकांना या परिषदेमध्ये सहभागी होण्यासाठी मोफत नोंदणी उपलब्ध करून देण्यात आली असून, जास्तीत जास्त संख्येने नोंदणी करून या परिषदेत सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाच्या सहव्यवस्थापकीय संचालकांतर्फे करण्यात आले आहे. परिषदेच्या दिवशी म्हणजेच दि. २७ जून २०२६ रोजी सायंकाळी वाशी येथील सिडको एक्झिबिशन सेंटर येथेच एका पत्रकार परिषदेचेही आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती महामंडळाच्या सह व्यवस्थापकीय संचालिका यांनी पत्रकात नमूद केले आहे.

# एमएनएम विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन

**उलवे : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या एम.एन.एम. विद्यालय व टी.एन.जी. कनिष्ठ विज्ञानविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्येयोगाचे महत्त्व रुजविणे तसेच निरोगी जीवनशैलीचा संदेश देणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांनी योगाचे महत्त्व स्पष्ट केले. योग प्रशिक्षक कांचन मानेयांनी विविध योगासने, प्राणायाम व ध्यान यांचे प्रात्यक्षिक सादर करून त्याचे आरोग्यदायी फायदे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.



विद्यार्थ्यांनीही मोठ्या उत्साहाने योगासने करून कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला.

या उपक्रमात पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय विभागातील विद्यार्थी तसेचशिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक तंदुरुस्ती,मानसिक शांतता आणि एकाग्रता वाढण्यास मदत होते, असा संदेश यावेळी देण्यात आला.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्राचार्या .सौ.सायली वडवलकर, पर्यवेक्षक, शिक्षकवृंद व कर्मचाऱ्यांनी विशेषपरिश्रम घेतले. या योग दिन उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण झाली

# नेरूळमधील राजमाता जिजाऊ गार्डन व तानाजी मालुसरे मैदानाची दुरवस्था

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरुळ सेक्टर ६ येथील राजमाता जिजाऊ गार्डन व तानाजी मालुसरे मैदान येथील विविध सुविधांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. गटारावरील तुटलेली झाकणं, उंदरांचा वाढता सुळसुळाट, मोडकळीस आलेले प्रवेशद्वार, निकामी पाणपोई, तुटलेले झोपाळे, खराब बसण्याची व्यवस्था तसेच परिसरात साचलेला कचरा आणि खराब अवस्थेतील कचराकुंड्या यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा व आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर शिवसेना कार्यकर्ते महादेव पवार यांनी नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त



डॉ. कैलास शिंदे यांनी स्वतः या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी दौरा करून परिस्थितीची पाहणी करावी व संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ दुरुस्ती, स्वच्छता आणि आवश्यक कारवाईचे निर्देश द्यावेत, अशी मागणी केली आहे.

# वाहतूक पोलिसांमुळे गंभीर अपघातग्रस्ताला मिळाले जीवदान; नागरिकांकडून कौतुक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल-जेएनपीटी महामार्गावरील करंजाडे परिसरात झालेल्या भीषण अपघातात गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीला वाहतूक पोलिसांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे वेळेत वैद्यकीय उपचार मिळाले. विशेष म्हणजे, जखमीची प्रकृती गंभीर असल्याचे लक्षात घेऊन ॲम्बुलन्सची प्रतीक्षा न करता त्याला तात्काळ खाजगी वाहनातून रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यामुळे जखमीचा जीव वाचण्यास मोठी मदत झाली.

करंजाडे येथील रहिवासी प्रदीप दास (वय ४१) हे पळस्पे ते अटल सेतू मार्गावर रस्ता ओलांडत असताना भरधाव वेगाने येणाऱ्या स्विफ्ट कारने त्यांना जोरदार धडक दिली. धडकेमुळे त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन ते रक्तबंबाळ अवस्थेत रस्त्यावर कोसळले. याच वेळी उरणकडे जात असलेले उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ



पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे यांच्या निदर्शनास ही घटना आली. त्यांनी क्षणाचाही विलंब न करता वाहन थांबवून परिस्थितीचा आढावा घेतला. जखमीची अवस्था गंभीर असल्याने ॲम्बुलन्सची वाट न पाहता त्याला तातडीने खाजगी वाहनातून उपचारासाठी एमजीएम रुग्णालय, कामोठे येथे रवाना करण्याच्या सूचना दिल्या. तसेच घटनेची माहिती पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांना दिली.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी तात्काळ बीट मार्शल पोलीस हवालदार अमीर मुलाणी व पोलीस शिपाई सुरेश जौंजाळ यांना रुग्णालयात दाखल झालेल्या जखमी व्यक्तीस आवश्यक मदत व उपचार मिळतील याची दक्षता घेण्याचे आदेश दिले. आदेशानुसार दोन्ही पोलीस कर्मचाऱ्यांनी एमजीएम रुग्णालयात जाऊन जखमी व्यक्तीच्या उपचाराबाबत आवश्यक समन्वय साधला. या संपूर्ण घटनेत वाहतूक पोलिसांनी दाखवलेले प्रसंगावधान, तात्काळ निर्णय क्षमता आणि मानवतावादी भूमिका विशेष उल्लेखनीय ठरली. अपघातग्रस्ताला सुवर्णक्षणात उपचार मिळवून देण्यासाठी घेतलेल्या तत्पर निर्णयामुळे त्याचा जीव वाचण्यास मदत झाली असून या कार्याबद्दल नागरिकांकडून वाहतूक पोलिसांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे.

# डंपरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा-नागोठणे मार्गावर भिसे खिंडीत डंपरने दिलेल्या धडकेत २२ वर्षीय दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली. अपघातात दोन्ही वाहनांचेही नुकसान झाले आहे.

डंपरचालक त्याच्या ताब्यातील वाहन (एमएच ०६ बीव्ही ७५९४) घेऊन जात असताना नागोठणेहून रोह्याकडे येत असलेल्या राज गणेश पतंगे (वय २२, रा. अष्टमी कोळीवाडा, रोहा) याच्या मोटरसायकलला (एमएच ०६ सीटी ६६०९) जोरदार धडक बसली. या अपघातात राजला गंभीर दुखापत झाली. त्याला रोहा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणी डंपरचालकाविरोधात रोहा पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे.

## खालापूर येथे शेतकरी मेळावा

**चौक** : खालापूर तालुकास्तरीय कृषी मेळावा बुधवारी (दि.२४) दुपारी १२ वाजता पंचायत समिती सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेंद्र थोरवे, आमदार महेश बालदी, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, सभापती वैकुंठ पाटील यांच्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, कृषी अधिकारी पवनकुमार उपस्थित राहणार आहेत.

## जाहिर नोटीस

**गुलमोहर पार्क सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., पनवेल, भुखंड क्र. ०६, सेक्टर १५ अे, सि. के.टी. शाळेसमोर, नवी मुंबई, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६,** तर्फे सदर गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीच्या पुनर्विकासाच्या कामासाठी बांधकाम क्षेत्रातील आर्किटेक्ट (पुनर्विकास प्रकल्प व्यवस्थापक) प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंन्स्ट (PMC) म्हणून नेमणुक करावयाची आहे. हे काम करण्यात स्वारस्य असणाऱ्या अनुभवी व कमीतकमी २० (वीस) वर्षे बांधकाम व पुनर्विकसन क्षेत्रातील तांत्रिक अहर्ता व अनुभव असलेल्या कंन्सल्टंन्स्ट व्यावसायिक तज्ञ व्यक्ती अथवा संस्था / कंपनीकडून यांचेकडून त्याकरीता देकार (निवीदा) मागविण्यात येत आहेत. याकामी देकार स्विकारण्याची अंतिम तारीख शनिवार दि. ०४/०७/२०२६ रोजी संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत असेल. आलेले सर्व देकार रविवार दि. ०५/०७/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता उघडण्यात येतील याकामासाठी आलेले देकार स्विकारण्याचे किंवा फेटाळण्याचे सर्व अधिकार हे गृहनिर्माण संस्था स्वतःकडे राखुन ठेवत आहे.

**स्थळ : पनवेल,**
**दिनांक: २४/०६/२०२६**

**सही/-** **अध्यक्ष** | **सही/-** **सचिव**

गुलमोहर पार्क सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., पनवेल, भुखंड क्र. ०६, सेक्टर १५ अे, सि.के.टी. शाळेसमोर, न्यु पनवेल, जि. रायगड, नवी मुंबई - ४१०२०६. मोब. : ९८६७०६०८०८ / ९०२९०१८०४१

## पनवेल महानगरपालिका
### ता. पनवेल जि. रायगड

कार्यालय-आयुक्त मुख्यालय, २ रा मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल- ४१०२०६
दुरध्वनी क्र- ०२२-२७४५८०४०/४१/४२
Email Id: panvelcorporation@gmail.com

### जाहीर बाजारभाव सूचना

| अनु.क्र. | बाजारभाव सूचना क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | निविदा/पमपा/मातंवि/ ३०२५/प्र.क्र.११/ १६२/२०२६ | पनवेल महानगरपालिकेतील क्लाउड सेवा सुरळीतपणे चालविण्यासाठी व्यवस्था करण्याबाबत |

या बाजारभाव बाबतची माहिती वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरबाबतचे बाजारभाव दि. **२३/०६/२०२६** ते दि. **२८/०६/२०२६** रोजी दुपारी **०३.००** वाजे पर्यंत माहिती व तंत्रज्ञान विभाग, पनवेल महानगरपालिका येथे सादर करण्यात यावी. सदर कामाबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागात प्राप्त होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**जा.क्र.पमपा/जनसंपर्क./३१२६/**
**प्र.क्र.१७३/१८५/२०२६**
दिनांक :- २२/०६/२०२६

**सही/-**
**उप आयुक्त ( मातंवि)**
**पनवेल महानगरपालिका**

## रोहा अष्टमी नगर परिषद

**ता. रोहा, जि. रायगड पिन कोड- ४०२१०९.**
**फोन नं. कार्यालय-०२१९४-२३५७३७ फॅक्स नं. ०२१९४-२३४०७८**
email : rohanagarpalika@gmail.com

### निविदा सूचना

रोहा अष्टमी नगर परिषद, रोहा नगर परिषद यांस कडून नोंदणीकृत अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून नगर परिषदेच्या पाणीपुरवठा व बांधकाम विभागाकरिता १) रोहा अष्टमी नगर परिषद पाणीपुरवठा विभागाकरिता आवश्यक यांत्रिकी साहित्य पुरवठा करणे (प्रथम प्रसिध्दी) २) रोहा अष्टमी नगर परिषद कार्यक्षेत्रातील अष्टमी भागातील रिव्हर व्हू इमारतीपासून कासार आळी पर्यंत १०० व्यासाची वितरण वाहिनी टाकणे. (प्रथम प्रसिध्दी) ३) रोहा अष्टमी नगर परिषद पाणीपुरवठा विभागाकरिता मागणीनुसार चेक नट/स्पिंडल पुरवठा करणे (द्वितीय प्रसिध्दी) ४) रोहा अष्टमी नगर परिषद हद्दीतील मच्छी मार्केट येथील अंतर्गत गटारावरती फायबरची जाळी टाकणे (द्वितीय प्रसिध्दी) कामाचे निविदा दरपत्रक मागविणेत येत आहेत. सदर संपुर्ण निविदा प्रक्रिया ऑफलाईन पध्दतीने होईल. निविदा नोटीस, प्रसिध्दी, सुचना, आवश्यक असणारी कागदपत्रे, शुध्दपत्रक इत्यादी माहिती नगर परिषद कार्यालयातील पाणीपुरवठा विभागात व बांधकाम विभागात दिनांक २४-०६-२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजले पासून ०३-०७-२०२६ पर्यंत दुपारी ४.०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल.

**क्र.रोनप/पापु/नि.सु./१००२/२०२६**
**दिनांक २३/०६/२०२६**

**सही/-**
**(अजयकुमार एडके)**
**मुख्याधिकारी**
**रोहा अष्टमी नगर परिषद**

**सही/-**
**वनश्री अवनी समिर शेडगे**
**नगराध्यक्षा**
**रोहा अष्टमी नगर परिषद**

## संस्थेच्या नावे असलेल्या स्थावर मालमत्तेचा लिलाव करून विक्री करण्याबाबतची
## जाहीर नोटीस

तमाम लोकांना जाहीर करण्यात येते की. कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित. पनवेल या संस्थेच्या ताबेकब्जात असलेली व नांवे असलेली खालील वर्णनाच्या मालमत्तेचा जाहिर लिलाव करून विकी करण्याचे दि. **३०/०६/२०२६** रोजी सकाळी **११.००** ते दुपारी **१.००** वाजता निश्चित केले आहे.

**"पनवेल महानगरपालिका यांचे हद्दीतील आणि सब रजिस्ट्रार पनवेल यांचे अधिकार कक्षेतील मौजे कामोठे, जुही अपार्टमेंट, रूम नं. डी/१०२, पहिला मजला, प्लॉट नं. ६३ ओ, सेक्टर ६अ, ता. पनवेल, जि. रायगड, क्षेत्र ३९४ चौ. फुट बिल्टअप."**

लिलाव व विक्री करण्यासाठी वसुली अधिकारी श्री. सुनिल सदानंद गद्रे कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल यांच्या कार्यालयात होईल.

कार्यालयीन पत्ता- **कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल रो हाऊस, प्लॉट १, ६२६,** मारूती अपार्टमेंट, पनवेल **४१०२०६.**

टिप- १) लिलावाचे अटी व शर्तीचे वाचन लिलावाचे वेळी करण्यात येईल.
२) लिलावापूर्वी कर्ज खाते बंद झाल्यास लिलाव रद्द केला जाईल.
३) येणे रक्कमेचा विचार करून मालमत्तेची विक्री केली जाईल.
४) कोणतेही कारण न दाखवता लिलाव मंजूर अगर नामंजूर करणे व पुढे ढकलणे याबाबतचे अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.
५) अपसेट व्हॅल्यू रू. **२९,६९,९०५/-** (अक्षरी रूपये एकोणतीस लाख एकोणसत्तर हजार नऊशे पाच मात्र) याचे वरती बोली करावी लागेल.

ठिकाण :- पनवेल
दिनांक :- **२३/०६/२०२६**
**जावक क्र. ३२/८७-२०२६-२७**

**सही/-**
**सुनिल सदानंद गद्रे**
**वसुली अधिकारी**
**कमल महिला नागरी सहकारी पतपेढी (मर्या.) पनवेल**

( पान ५ वरुन )

## नमुना - १
## खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत
## जाहीर नोटीस

क्र. उजि(भू) राज/कार्या-१/थेटखरेदी/मौ-हुमगाव/एसआर-१६३७/२०२६
उपजिल्हाधिकारी भूसंपादन रायगड (०) अलिबाग यांचे कार्यालय
दि २२/०६/२०२६

ज्या अर्थी, कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड यांनी कर्जत तालुक्यातील मौजे हुमगाव येथील अनुसूची १ मध्ये समाविष्ट जमिनी या मे टोरंट पावर कंपनीच्या प्रस्तावित साईडोंगर-१ कर्जत (३००० MW) उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी पर्यायी रस्ता म्हणून राजनाला कालवा व पाली पोटल कालवा याचे दरम्यान मिसिंग लिंक रस्त्यासाठी प्रस्ताव या सार्वजनिक प्रयोजनाकरीता महसुल व वन विभागाकडील शासन निर्णय, क्रं. संकिर्ण ०३/२०१५/प्र.क्र. ३४/अ-२, दि. १२/०५/२०१५ व दि. ३०/०९/२०१५ व शासन परिपत्रक क्रं. एलक्यूएन-०१/२०१७ प्र.क्र. १२/अ-२ दि. २५/०१/२०१७ मधील तरतुदीस अनुसरून खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड यांचे नावे घेण्याबाबत प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी रायगड यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्या अर्थी, मा. जिल्हाधिकारी रायगड यांचे आदेश क्रमांक क्र. भूस/टे-६/उदंचन जलविद्युत प्रकल्प APPROACH ROAD-MISSING LINK/२०२६ दि. १५/०६/२०२६ अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी उक्त शासन निर्णय दिनांक १२/०५/२०१५ व दि. ३०/०९/२०१५ आणि तनुषंगिक शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.एलक्यूएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२/दिनांक २५/०१/२०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्या अर्थी आता,

१. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार, मी श्री. श्रीकांत गायकवाड उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) रायगड (०) अलिबाग याद्वारे,

एक) अनुसूची-एक मध्ये नमुद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे, आणि

दोन) प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समिती मार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेडयुल १ च्या तरतुदीनूसार संबंधित जमीनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर २५% रक्कम वाढीव देऊन, मोबदला निश्चित करण्यात येईल.

तीन) संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन वाटाघाटीद्वारे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चीत केलेला मोबदला संपूर्णतः अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्र (विकल्प) मागवित आहे.

**सही/-**
**(श्रीकांत गायकवाड)**
**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)**
**रायगड (०) अलिबाग**

**अनुसूची-१**
**खरेदी द्यावयाच्या जमीनीचा तपशिल**
**गांव : हुमगाव, तालुकाः कर्जत, जिल्हाः रायगड**

| अ.क्र. | भूमापन क्रमांक/ गट क्रमांक | जमीनीचा प्रकार | जमीनीचा वर्ग | भूधारकाचे नाव | संपादनाचे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | १/१ पै | जिरायत | १ | गणपत जैतू बार्शी<br>मधुकर जैतु बार्शी<br>सुलोचना दुंदा बार्शी<br>प्रमोद दुंदा बार्शी<br>संदीप दुंदा बार्शी<br>मालता संतोष जोशी | ०.०८.१० |
| | १/३ पै | जिरायत | २ | मधुकर गंगाराम शेळके | |
| | १/४ पै | जिरायत | १ | मारूती रंगा भुर्डरे<br>काशिराम रंगा भुर्डरे<br>हौसाबाई लक्ष्मण मोरे<br>मंदा पंढरी घोरपडे<br>राजाराम त्रिंबक कांबेरे<br>माया रविंद्र कालेकर<br>संदिप त्रिंबक कांबेरे<br>सुंदर गोपाळ सोनावळे | |
| | १/५/अ पै | जिरायत | १ | शांताराम रावजी बार्शी<br>पांडूरंग रावजी बार्शी<br>सुलभा ज्ञानेश्वर लोभी<br>प्रतिभा विलास ढोले<br>गणेश नामदेव बार्शी<br>पद्माकर नामदेव बार्शी | |
| | १/५/ब पै | जिरायत | १ | प्रकाश मंगल बागडे | |
| | १/५/क पै | जिरायत | १ | शांताराम रावजी बार्शी<br>पांडूरंग रावजी बार्शी<br>सुलभा ज्ञानेश्वर लोभी<br>प्रतिभा विलास ढोले<br>गणेश नामदेव बार्शी<br>पद्माकर नामदेव बार्शी | |
| | १/६ पै | जिरायत | १ | अरूण सिताराम बार्शी | |
| | १/७ पै | जिरायत | १ | अशोक महादू बार्शी | |
| २ | २/२ पै | जिरायत | १ | लक्ष्मण बुवाजी बार्शी<br>इंदिरा तुकाराम बार्शी<br>निवृत्ती तुकाराम बार्शी<br>प्रमिला संजय पाटील<br>मंजुला तुकाराम बार्शी<br>अ.पा.क. आई सुनंदा बार्शी<br>सुनंदा तुकाराम बार्शी<br>केदार दशरथ भगत<br>दिपक बाळू बार्शी | ०.१५.७० |
| ३ | ७७/ १ पै | जिरायत | १ | रामभाऊ पांडु बार्शी<br>रघुनाथ पांडु बार्शी<br>बेबी रमेश डायरे<br>मुक्ता हरिश्चंद्र बार्शी<br>रविंद्र हरिश्चंद्र बार्शी<br>सोपान हरिश्चंद्र बार्शी<br>कमलाकर गजानन बार्शी<br>योगेश गजानन बार्शी<br>वंदना लोमेश भोईर<br>सुरेखा गजानन बार्शी | ०.११.०० |
| ४ | ८०/ १ पै | जिरायत | १ | बबन गंगाराम बार्शी<br>मारूती गंगाराम बार्शी<br>यशवंत गंगाराम बार्शी<br>परशुराम गंगाराम बार्शी | ०.१९.८० |
| | ८०/ २ पै | जिरायत | १ | रामभाऊ पांडु बार्शी | |
| | ८०/ ४/अ पै | जिरायत | १ | सुरेश हिरू सोनावळे | |
| | ८०/४/ ब पै | जिरायत | १ | भुषण विष्णु पिसेकर<br>वैभव विष्णु पिसेकर | |
| ५ | ८१/ ३ पै | जिरायत | १ | सोपान हरिश्चंद्र बार्शी<br>बेबी रमेश डायरे<br>मुक्ता हरिश्चंद्र बार्शी<br>रविंद्र हरिश्चंद्र बार्शी | ०.१९.०० |
| | ८१/ ४ पै | जिरायत | १ | गणपत जैतू बार्शी<br>मधुकर जैतु बार्शी<br>सुलोचना दुंदा बार्शी<br>प्रमोद दुंदा बार्शी<br>संदीप दुंदा बार्शी<br>मालता संतोष जोशी | |
| ६ | ८२/ ३ पै | जिरायत | १ | पांडूरंग रावजी बाशी | ०.०८.२० |
| | ८२/ ५ पै | जिरायत | १ | मधुकर वाळकू बार्शी | |
| ७ | ८३ पै | जिरायत | १ | भगवान बुवाजी बार्शी<br>अरूण सिताराम बार्शी<br>यमुनाबाई सिताराम बार्शी<br>शिवाजी सिताराम बार्शी<br>संजय बुवाजी बार्शी | ०.१०.२० |

**ठिकाण : अलिबाग**
**तारीख : २२/०६/२०२६**

**सही/-**
**(श्रीकांत गायकवाड)**
**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) रायगड (०) अलिबाग**

**जिमाका/रायगड/जाहिरात/४८/७६७/२०२६**

# लिओनेल मेस्सीने इतिहास रचला!

## फिफा वर्ल्डकपमध्ये सर्वाधिक गोल करण्याचा विक्रम

**डॅलस (अमेरिका) : वृत्तसंस्था**

अर्जेंटिनाचा महान फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीने फुटबॉल जगतात पुन्हा एकदा एका नव्या सुवर्ण अध्यायाची नोंद केली आहे. फिफा विश्वचषक २०२६मधील ऑस्ट्रियाविरुद्धच्या सामन्यात गोल करत मेस्सीने पुरुषांच्या फिफा विश्वचषक इतिहासात सर्वाधिक गोल करण्याचा ऐतिहासिक विक्रम आपल्या नावावर केला आहे. या १७व्या विश्वचषक गोल्सह त्याने जर्मनीचा दिग्गज खेळाडू मिरोस्लाव क्लोसचा तब्बल १२ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडीत काढला आहे.



ग्रुप 'जे'मधील ऑस्ट्रियाविरुद्धच्या सामन्यात मेस्सीने हा पराक्रम केला. सामन्याच्या सुरुवातीला म्हणजेच नवव्या मिनिटाला अर्जेंटिनाला पेनल्टी मिळाली होती, मात्र मेस्सीचा हा शॉट गोलपोस्टच्या बाहेर गेल्याने मैदानात काही काळ शांतता पसरली होती, परंतु ही निराशा मेस्सीने फार काळ टिकू दिली नाही.

सामन्याच्या ३८व्या मिनिटाला सहकाऱ्यांकडून मिळालेल्या अचूक पासेसचा फायदा उठवत मेस्सीने डी-बॉक्सच्या जवळून एक अप्रतिम आणि वेगवान शॉट मारत चेंडू थेट गोलपोस्टच्या डाव्या कोपऱ्यात धाडला. या गोलसह मेस्सीच्या विश्वचषक कारकिर्दीतील एकूण गोल्सची संख्या आता १७ झाली आहे. यापूर्वी हा विक्रम जर्मनीच्या मिरोस्लाव क्लोसच्या नावावर होता, ज्याने २०१४ च्या विश्वचषकात आपला १६वा गोल करून इतिहास रचला होता.

३८ वर्षे ३६३ दिवस वय असलेल्या मेस्सीने आपल्या ३९व्या वाढदिवसाच्या अवघ्या दोन दिवस आधी हा पराक्रम केला. याशिवाय तो २००६, २०१०, २०१४, २०१८, २०२२ आणि २०२६ अशा तब्बल सहा वेगवेगळ्या विश्वचषक स्पर्धांमध्ये खेळणारा जगातील पहिला पुरुष फुटबॉलपटू ठरला आहे. यंदाच्या विश्वचषकात मेस्सी उत्कृष्ट फॉर्ममध्ये असून त्याने अवघ्या दोन सामन्यांत चार गोल केले आहेत.

# मराठमोळ्या सूर्यांश शेडगेला भारतीय संघात संधी

**मुंबई : प्रतिनिधी**



भारतीय क्रिकेट संघाच्या आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यापूर्वी टीम इंडियाला एकापाठोपाठ एक मोठे धक्के बसले आहेत. स्टार फिरकीपटू वरुण चक्रवर्तीपाठोपाठ आता फॉर्मात असलेला अष्टपैलू खेळाडू नितीश कुमार रेड्डी दुखापतीमुळे आगामी आंतरराष्ट्रीय टी-२० मालिकेतून बाहेर पडला आहे. आगामी आव्हानात्मक दौरा लक्षात घेता भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) नितीश रेड्डीचा पर्याय म्हणून मुंबईच्या युवा आणि आक्रमक सूर्यांश शेडगेची भारतीय संघात निवड केली आहे.

भारतीय संघाचा आयर्लंड दौरा येत्या २६ जूनपासून सुरू होत असून या दौऱ्यात संघ दोन टी-२० सामन्यांची मालिका खेळणार आहे. त्यानंतर लगेचच १ जुलैपासून भारतीय संघ इंग्लंड दौऱ्यावर जाणार असून तिथे पाच टी-२० सामन्यांची मालिका खेळवली जाईल. मात्र या दोन्ही महत्त्वाच्या मालिकांना नितीश रेड्डी मुकणार आहे.

नितीशव्यतिरिक्त फिरकीपटू वरुण चक्रवर्तीदेखील आयपीएलदरम्यान डाव्या पायाला झालेल्या दुखापतीमुळे सध्या बंगळुरूमध्ये रिहॅब प्रक्रियेत आहे. खेळाडूंच्या फिटनेसला प्राधान्य देत व्यवस्थापनाने घाईगडबडीत त्यांना मैदानात न उतरवण्याचा निर्णय घेतला आहे.

२३ वर्षीय अष्टपैलू खेळाडू सूर्यांश शेडगेला श्रीलंका येथे नुकत्याच पार पडलेल्या त्रिकोणी मालिकेत भारत 'अ' संघासाठी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीचे बक्षीस मिळाले आहे. सूर्यांशने या स्पर्धेत मध्यक्रमात फलंदाजी करताना पाच सामन्यांत १४७ धावा केल्या, तसेच २३ षटके गोलंदाजी करत संघाच्या विजयात मोलाचे योगदान दिले. याशिवाय २०२४-२५मध्ये सय्यद मुश्ताक अली करंडक जिंकणाऱ्या मुंबई संघाचा तो महत्त्वाचा शिलेदार होता. या स्पर्धेत त्याने खालच्या मध्यक्रमात फलंदाजी करताना २५१.९२च्या तुफानी स्ट्राईक रेटने १३१ धावा कुटल्या होत्या. त्याची हीच अष्टपैलू क्षमता पाहून निवड समितीने त्याच्यावर विश्वास दाखवला आहे.

# फ्रान्स-इराक सामना वादळामुळे मध्यंतरात स्थगित




**फिलाडेल्फिया : वृत्तसंस्था**

फिफा वर्ल्डकप २०२६मधील फ्रान्स आणि इराक यांच्यातील ग्रुप सामना वादळी हवामानाचा इशारा मिळाल्यानंतर मध्यंतरात स्थगित करण्यात आला. विजांचा कडकडाट आणि वादळाची शक्यता लक्षात घेऊन प्रेक्षकांना तातडीने सुरक्षित आश्रयस्थळी जाण्याचे निर्देश देण्यात आले.

फिलाडेल्फियातील लिंकन फायनान्शियल फील्ड येथे खेळल्या जात असलेल्या या सामन्यात फ्रान्सने पहिल्या हाफमध्ये १-० अशी आघाडी घेतली होती. स्टार फुटबॉलपटू किलियन एमबाप्पे याने १४व्या मिनिटाला गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली.

सामन्याच्या सुरुवातीला वातावरण कोरडे होते, मात्र पहिल्या हाफच्या अखेरीस पावसाला सुरुवात झाली. मध्यंतराची शिट्टी वाजताच स्टेडियम प्रशासनाने चाहत्यांना खुल्या आसनव्यवस्थेतील जागा रिकाम्या करून झाकलेल्या भागात जाण्याचे आवाहन केले. ६८ हजारांहून अधिक क्षमतेच्या या स्टेडियममधील बहुतांश आसनव्यवस्था खुल्या जागेत असल्याने हजारो प्रेक्षकांना कॉन्कोर्स आणि सुरक्षित भागांमध्ये आश्रय घ्यावा लागला.

फिफा अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार सामना किमान ३० मिनिटांसाठी विलंबित करण्यात आला. अमेरिकेत वादळ किंवा विजांचा धोका आढळल्यास कठोर सुरक्षा प्रोटोकॉल लागू केले जातात. यंदाच्या वर्ल्डकपमधील खराब हवामानामुळे स्थगित करण्यात आलेला हा पहिलाच सामना ठरला आहे.

## अमन राव पेरालाचे विक्रमी शतक

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

राजस्थान रॉयल्सचा खेळाडू अमन राव पेराला याने तेलंगणा टी-२० लीगमध्ये अवघ्या ३२ चेंडूत शतक झळकावत भारतीय टी-२० लीगमधील सर्वात वेगवान शतक करणाऱ्या भारतीय खेळाडूचा मान पटकावला आहे. यासह त्याने वैभव सूर्यवंशीचा ३५ चेंडूत केलेल्या शतकाचा विक्रम मोडला आहे.

२२ वर्षीय अमन राव पेराला हा हैदराबादकडून देशांतर्गत क्रिकेट खेळतो. तेलंगणा टी-२० लीगमध्ये तो वारंगल वॉरियर्स संघाचे नेतृत्व करत आहे. मेडक फाल्कन्सविरुद्धच्या सामन्यात त्याने अविश्वसनीय फलंदाजी करत अवघ्या ४८ चेंडूत १४२ धावांची धडाकेबाज खेळी केली. या खेळीत त्याने तब्बल १३ षटकार आणि १२ चौकार लगावले. त्याचा स्ट्राईक रेट तब्बल २९५.८३ इतका होता.

# ऋषभ पंत दिल्ली संघात परतला

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

यंदाच्या इंडियन प्रीमियर लीगच्या निराशाजनक हंगामानंतर लखनऊ सुपर जायंट्स आणि ऋषभ पंत यांनी सामंजस्याने वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे. मानधनात मोठी कपात स्वीकारत पंत आता त्याच्या जुन्या दिल्ली कॅपिटल्स संघात परतण्यासाठी सज्ज झाला आहे, तर कुलदीप यादव आता लखनऊ सुपर जायंट्स संघाकडून खेळेल, अशी घोषणा आयपीएलने आपल्या अधिकृत पत्रकात केली आहे.



टाटा आयपीएल २०२५च्या मेगा ऑक्शनमध्ये लखनऊ सुपर जायंट्सने पंतला तब्बल २७ कोटी रुपयांची विक्रमी बोली लावून आपल्या संघात समाविष्ट केले होते, ही आयपीएल इतिहासातील सर्वात मोठी बोली ठरली होती, मात्र आता झालेल्या ट्रेडनंतर तो १५ कोटी रुपयांच्या सुधारित शुल्कासह पुन्हा दिल्ली कॅपिटल्समध्ये दाखल होईल. म्हणजेच दिल्लीत येण्यासाठी त्याने तब्बल १२ कोटी रुपयांचे नुकसान सहन केले आहे.

खराब कामगिरीनंतर पंतने आयपीएल २०२६चा हंगाम संपताच लखनऊ सुपर जायंट्सच्या कर्णधारपदाचा राजीनामा दिला होता. त्याआधी तो २०१६ ते २०२४ या कालावधीत सलग नऊ हंगाम दिल्ली संघात होता. दिल्ली कॅपिटल्ससाठी त्याने सर्वाधिक १११ सामने खेळले आहेत. जवळपास एक दशक या फ्रँचायझीचा मुख्य चेहरा राहिलेल्या पंतने २०२१ ते २०२४ दरम्यान चार हंगामात ४३ सामन्यांमध्ये दिल्लीचे नेतृत्वही केले आहे.

### कुलदीप यादव लखनऊकडून खेळणार

चायनामन गोलंदाज कुलदीप यादव दिल्ली कॅपिटल्समधील पाच वर्षांचा यशस्वी प्रवास संपवून बाहेर पडला आहे. २०२२मध्ये दिल्ली संघात सहभागी झाल्यापासून कुलदीपने ६५ सामन्यांत ७२ बळी घेत आयपीएलमधील सर्वात प्रभावी विकेट घेणारा गोलंदाज म्हणून स्वतःला सिद्ध केले आहे. भारताचा हा आघाडीचा मर्यादित षटकांचा गोलंदाज आता त्याच्या सध्याच्या १३.५० कोटी रुपयांच्या मानधनासह लखनऊ सुपर जायंट्स संघात दाखल होईल.

# फ्लेमिंगच राहणार सीएसकेच्या प्रशिक्षकपदी



**चेन्नई : वृत्तसंस्था**

चेन्नई सुपर किंग्सच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. संघाचे मुख्य प्रशिक्षक स्टीफन फ्लेमिंग आयपीएल २०२७ मध्येही सीएसकेचे मुख्य प्रशिक्षक म्हणून कायम राहणार आहेत.

आयपीएल २०२६मधील संघाच्या निराशाजनक कामगिरीनंतर मुख्य प्रशिक्षक फ्लेमिंग यांच्या पदाबद्दल शंका निर्माण झाली होती. त्यांची जागा दुसऱ्या प्रशिक्षकाने घेतली जाईल अशी अटकळ होती, पण संघ व्यवस्थापन सध्या कोचिंग स्टाफमध्ये कोणताही मोठा बदल करण्याच्या विचारात नाही आहे.

स्टीफन फ्लेमिंग हे सीएसकेच्या च्या यशामागील प्रमुख शिल्पकार मानले जातात. २००९पासून त्यांनी मुख्य प्रशिक्षकाची जबाबदारी सांभाळली असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली चेन्नईने पाच वेळा आयपीएलचे विजेतेपद जिंकले आहे तसेच संघाने तब्बल दहा वेळा अंतिम फेरी गाठण्याचा पराक्रम केला आहे. यामुळे संघ व्यवस्थापनाने त्यांच्यावर विश्वास कायम ठेवला आहे.

# वैभव सूर्यवंशीला अखेर टीम इंडियाची जर्सी

**मुंबई : प्रतिनिधी**

अवघ्या १५ वर्षांच्या वयात आयपीएलमध्ये धडाकेबाज कामगिरी करून क्रिकेटविश्वाचे लक्ष वेधून घेणाऱ्या वैभव सूर्यवंशीसाठी आयुष्यातील सर्वात मोठा क्षण अखेर आला आहे. आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय संघात निवड झालेल्या या युवा फलंदाजाला टीम इंडियाची अधिकृत जर्सी मिळाली आणि त्या क्षणी तो भावूक झाल्याचे पहायला मिळाले.

भारतीय संघाचे थ्रो-डाउन स्पेशालिस्ट रघू यांनी वैभवची जर्सी त्याच्या हॉटेल रूमपर्यंत पोहचवली. खोलीच्या दरवाजावर 'प्लेयर नंबर ५३२' असा उल्लेख करण्यात आला होता. दार उघडताच वैभवने रघू यांच्या पाया पडून आशीर्वाद घेतला. त्यानंतर जर्सी हातात घेताच त्याच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि डोळ्यांतील भावनांचा पूर लपवता आला नाही. या खास क्षणाचा व्हिडीओ बीसीसीआयने सोशल मीडियावर शेअर केला आहे.

> *माझ्याकडे शब्दच नाहीत. ज्या स्वप्नासाठी मी पहिल्यांदा हातात बॅट घेतली, मैदानावर घाम गाळला, कठोर सराव केला, ते स्वप्न आज पूर्ण झाले आहे. टीम इंडियाची जर्सी घालण्याची प्रक्रिया आज पूर्णत्वास गेली आहे. हा क्षण शब्दांत मांडणे माझ्यासाठी खूप कठीण आहे.*
>
> **-वैभव सूर्यवंशी**

वैभव सूर्यवंशीने नुकत्याच पार पडलेल्या आयपीएल हंगामात तुफानी फलंदाजी करत तब्बल ७७६ धावा केल्या आणि 'ऑरेंज कॅप'वर कब्जा केला. या दरम्यान त्याने तब्बल ७२ षटकार ठोकत विक्रमांची मालिका रचली. आता देशांतर्गत आणि आयपीएल क्रिकेट गाजवल्यानंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्येही मोठी छाप पाडण्याची संधी त्याच्यासमोर आहे.



# ईसीबीकडून स्टोक्स, अटकिन्सन निर्दोष

**लंडन : वृत्तसंस्था**



इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स आणि वेगवान गोलंदाज गस अटकिन्सन या दोघांना इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाने (ईसीबी) नाईट क्लबमधील घटनेप्रकरणी निर्दोष ठरवले आहे. प्रकरणाच्या तपासानंतर स्वतंत्र क्रिकेट नियामकाने स्पष्ट केले की बेन स्टोक्स आणि गस अटकिन्सन यांच्यावर कोणतीही पुढील कारवाई केली जाणार नाही.

पहिल्या कसोटीतील विजयानंतर दोन्ही खेळाडूंनी संघाच्या मध्यरात्रीच्या संचारबंदीचे उल्लंघन केले आणि ते लंडनच्या एका नाईट क्लबमध्ये गेले. तिथे त्यांचा कथितरित्या इंग्लिश रग्बी क्लब सारासेन्सच्या एका खेळाडूशी वाद झाला. जेव्हा त्या रग्बी खेळाडूने संघाच्या एका सुरक्षा अधिकाऱ्यावर हल्ला केला, तेव्हा प्रकरण अधिकच चिघळले. या घटनेनंतर इंग्लंड संघ व्यवस्थापनाने स्टोक्स-अटकिन्सन यांना दुसऱ्या कसोटीतून वगळले होते. त्यांच्या अनुपस्थितीत जो रूटने संघाचे नेतृत्व केले.

# केप व्हर्डेची उरुग्वेशीही बरोबरी

**मियामी : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक स्पर्धेत पदार्पण करणाऱ्या केप व्हर्डेने पहिल्या सामन्यात स्पेन आणि आता दुसऱ्या सामन्यात उरुग्वे या दोन माजी विजेत्या संघांना बरोबरीत रोखून आपल्या जादूई कामगिरीने फुटबॉल विश्वाला चकित केले. या दुसऱ्या बरोबरीने केप व्हर्डे संघाच्या बाद फेरी गाठण्याच्या आशा जिवंत राहिल्या.

मियामी स्टेडियमवर उरुग्वेच्या पाठीराख्यांचा मोठा आवाज असूनही केप व्हर्डेचे खेळाडू डगमगले नाहीत. आपल्या मूठभर चाहत्यांच्या प्रोत्साहनाच्या जोरावर केप व्हर्डे संघाने पिछाडीवरून बलाढ्य उरुग्वे संघाला २-२ असे बरोबरीत रोखण्याची किमया साधली. सामन्याच्या २१व्या मिनिटाला केविन पिना याने उरुग्वेची बचावफळी शिताफीने भेदत गोलरक्षक फर्नांडे मुस्लेराला चकवून गोल केला आणि केप व्हर्डे संघाला आघाडीवर नेले.



विश्वचषक स्पर्धेतील हा या देशाचा पहिलाच गोल ठरला.

यानंतर अनुभवी उरुग्वेच्या खेळाडूंनी पूर्वार्धाच्या अगदी अखेरच्या टप्प्यात एका मिनिटांत दोन गोल करून मध्यंतराला आघाडी मिळवून आपले आव्हान कायम ठेवले होते. प्रथम मॅक्सी अराउझो आणि नंतर भरपाई वेळेत ॲगस्टिन कानेबियो यांनी हे गोल केला.

पूर्वार्धात लागोपाठ दोन गोल केल्यानंतर उत्तरार्धात उरुग्वेचा खेळ उंचावणे अपेक्षित होते, मात्र त्यांच्या खेळात अधिक विस्कळीतपणा दिसून आला. विशेषतः बचावफळीला अपेक्षेप्रमाणे कामगिरी करता आली नाही. याचा फायदा केप व्हर्डे संघाने अचूक उचलला. उत्तरार्धात बदली खेळाडू म्हणून आलेल्या वारेलाने मथियास ऑलिव्हेराच्या खराब पासचा फायदा घेतला. या वेळी गोलरक्षक मुस्लेरा गोलपोस्ट सोडून पुढे आला आणि वारेलाने अगदी हलकेच रिकाम्या गोलपोस्टमध्ये चेंडू ढकलत सामना बरोबरीत आणला. यानंतर दोन्ही संघांना विजयी गोल करता आला नाही.

### चाळीशीपार गोलरक्षकांची भिंत

वयाची चाळीशी पार गोलरक्षकांची जिद्द या सामन्यात पहायला मिळाली. एकाच सामन्यात चाळीशी पार करणारे गोलरक्षक दोन गोलपोस्टमध्ये उभे राहण्याचा हा विश्वचषक इतिहासातील एक अनोखा प्रसंग ठरला. उरुग्वेच्या मुस्लेराने १६ जून रोजीच वयाची ४० वर्षे पूर्ण केली, तर केप व्हर्डेचा ४० वर्षीय गोलरक्षक वोझिन्या हादेखील या सामन्याचा हिरो ठरला.

# महिला क्रिकेटपटूंसाठी विशेष आराखडा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयसीसी अर्थात आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने महिला क्रिकेटपटूंसाठी 'प्रसूतीनंतर पुनरागमन' ही अत्यंत संवेदनशील आणि व्यावहारिक मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. आई झाल्यानंतरही महिला खेळाडू सन्मानाने आणि सुरक्षितपणे पुन्हा मैदानावर परतू शकतील हा या धोरणाचा मुख्य उद्देश आहे.

महिला खेळाडूला आई होण्याच्या प्रवासापासून ते पुन्हा मैदानात पहिली धाव घेईपर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर साथ देण्यासाठी '६ आर'चा एक विशेष आराखडा तयार करण्यात आला आहे. ऑस्ट्रेलिया संघाच्या डॉक्टर फिलिपा इंगे यांच्या नेतृत्वाखाली ही नियमावली तयार झाली आहे. यात केवळ खेळाचाच विचार नाही, तर एका आईच्या व्यावहारिक गरजाही जपल्या आहेत. सरावाच्या वेळात लवचिकता असणे, स्टेडियमवर बाळाला दूध पाजण्यासाठी किंवा त्याची काळजी घेण्यासाठी हक्काची व सुरक्षित जागा असणे, प्रवासातही बाळाला सोबत ठेवण्यासाठी मदत करणे अशा अनेक कौतुकास्पद बाबींचा यात समावेश आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com